।। विद्वान् सर्वत्र पूज्यते ।।



कुलगुरु कै. वि. गं. तथा
दादासाहेब केतकर





शिक्षणमहर्षी कै.डॉ.ग.श्री. खैर
तथा अण्णासाहेब खैर


पुणे विद्यार्थी गृहाचे मासिक

# समाचार

**Pune Vidyarthi Griha's 'Samachar' Magazine April 2016 - Pages - 44**

संपादक : श्री. रामचंद्र लक्ष्मण शेटे

कार्यकारी संपादक : प्राचार्य हणमंत भोसले

* पुणे * वर्ष ६७ वे * अंक ६ * **एप्रिल २०१६** * किंमत रु. १०/- * वार्षिक वर्गणी रु. १००/-





दि.१८ मार्च २०१६ रोजी पुणे येथील अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी प्रमुख पाहुणे सहाय्यक पोलिस आयुक्त श्री. मिलिंद मोहिते यांचा सत्कार करताना कार्याध्यक्ष श्री. रामचंद्र शेटे समवेत डावीकडून कुलसचिव श्री. सुनिल रेडेकर, कार्यवाह प्रा. राजेंद्र कांबळे, संचालक श्री. कृष्णाजी कुलकर्णी व श्री. आनंद कुलकर्णी आणि उपकार्याध्यक्ष श्री. सुभाष जिर्गे

# अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, पुणे




वरिष्ठ पोलिस निरीक्षक
श्री. शशिकांत शिंदे यांचा सत्कार करताना
कार्यवाह प्रा. राजेंद्र कांबळे
समवेत कुलसचिव श्री. सुनिल रेडेकर



वरिष्ठ पोलिस निरीक्षक
श्री. श्रीधर जाधव यांचा सत्कार करताना
उपकार्याध्यक्ष श्री. सुभाष जिर्गे
समवेत संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर



अभिनेत्री केतकी माटेगावकर हिचे स्वागत करताना
उपकार्याध्यक्ष श्री. सुभाष जिर्गे आणि
कुलसचिव श्री. सुनिल रेडेकर



अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालयातील प्राध्यापकांचा सत्कार करताना
सहाय्यक पोलिस आयुक्त श्री. मिलिंद मोहिते

संपादकीय

# राष्ट्रीय विज्ञान दिवस

भारतात १९८६ पासून प्रतिवर्षी २८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय विज्ञान दिवस साजरा केला जातो. २८ फेब्रुवारी १९२८ रोजी कोलकत्यामध्ये डॉ. सी. व्ही. रामन यांनी रामन इफेक्टचा शोध लावला आणि त्या संशोधनाबद्दल त्यांना १९३० मध्ये विज्ञानाचे नोबेल पारितोषिक दिले गेले. विज्ञानाचे नोबेल पारितोषिक मिळविणारे ते पाहिले भारतीय म्हणून २८ फेब्रुवारी हा दिवस राष्ट्रीय विज्ञान दिवस म्हणून पाळला जातो. विज्ञानाबद्दल विद्यार्थ्यांत आकर्षण निर्माण व्हावे, प्रेरणा निर्माण व्हावी, विज्ञान आणि वैज्ञानिक संशोधनाबद्दल जनतेमध्येही जागृती निर्माण व्हावी म्हणून हा दिवस साजरा केला जातो. भारतीय वैज्ञानिक आचार्य प्रफुल्लचंद्र राय, डॉ. सी. व्ही. रामन, डॉ. होमी भाभा, डॉ. विक्रम साराभाई, डॉ. अब्दुल कलाम आणि जुन्या काळातील वैज्ञानिक आर्यभट, वराहमिहिर तसेच पाश्चात्य देशातील गॅलीलियो, आर्किमिडीज, न्यूटन, आइनस्टाइन, स्टीफन हॉकिंग अशा प्रसिध्द संशोधकांचा आणि त्यांच्या कार्याचा विद्यार्थ्यांना परिचय व्हायलाच हवा.

डॉ. चंद्रशेखर वेंकट रामन यांचा जन्म ७ नोव्हेंबर १८८८ रोजी त्रिचनापल्लीजवळ थिरवनैकुवल या गावी झाला. वडील विशाखापट्टणच्या ए.वी.एन कॉलेजमध्ये मॅथमॅटिक्स व फिजिक्सचे प्राध्यापक होते. तेथील प्राथमिक शिक्षणानंतर मद्रासच्या प्रसिध्द प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये सी. व्ही. रामन यांचे कॉलेज शिक्षण झाले. फिजिक्समध्ये त्यांना सुवर्णपदक मिळाले. एम्. एस्सी मध्ये ते पहिले आले. ते आय. सी. एस. परीक्षाही उत्तीर्ण झाले आणि त्यांनी कोलकत्यात डेप्युटी अकौंटंट जनरलच्या नोकरीला सुरवात केली. संशोधनात त्यांना खास रस होता पण नोकरीत बराच वेळ जायचा आणि संशोधनास थोडासा वेळ मिळे. इंडियन असोसिएशन फॉर कल्टिवेशन ऑफ सायन्सच्या प्रयोगशाळेत ते सायंकाळी संशोधन करीत. कधी कधी रात्रभर प्रयोगशाळेत जाई; असा संशोधनाविषयी जबरदस्त झपाटलेला हा वैज्ञानिक होता. नोकरीचा राजीनामा देऊन त्यांनी कोलकत्ता विद्यापीठात फिजिक्सचे प्राध्यापक म्हणून कामाला सुरवात केली, आणि एक उत्कृष्ट प्राध्यापक म्हणून नावलौकिक मिळवला. १९४८ मध्ये निवृत्त झाल्यावर त्यांनी बंगलोर येथे रामन रीसर्च इन्स्टिट्यूटची स्थापना केली आणि अखेरपर्यंत त्यांचे संशोधन कार्य तेथेच चालले.

१९२१ मध्ये बोटीने युरोपच्या प्रवासात जात असताना समुद्राचा आणि पारदर्शक हिमनगांचा निळा रंग पाहून त्याचे कारण शोधण्याची जिज्ञासा त्यांच्यात निर्माण झाली. भारतात परतल्यावर काही संशोधन प्रयोग केल्यावर समुद्राचा रंग निळा का यावर त्यांनी पुस्तक लिहिले. १९२४ मध्ये प्रो. रामन यांना लंडनच्या रॉयल सोसायटीची फेलोशिप मिळाली.

रामन इफेक्टच्या संशोधनाचाही एक किस्सा आहे. १९२७ मध्ये त्यांच्या एका विद्यार्थ्याने- के. एस्. कृष्णन (हे नंतर दिल्लीच्या नॅशनल फिजिकल लॅबोरेटरीचे डायरेक्टर झाले) यांनी माहिती दिली की प्रो. कॉम्प्टन यांना Scattering of X-rays या विषयावर नोबेल पारितोषिक दिले गेले आहे. त्यावर रामन म्हणाले जर कॉम्प्टन इफेक्ट 'क्ष' किरणावर लागू पडतो तर प्रकाशकिरणांवर लागू व्हायला हवा. त्यानुसार त्यांनी प्रयोगांना सुरवात केली. मर्क्यूरी आर्कच्या मोनोक्रोमॅटिक प्रकाशाने पारदर्शक पदार्थातून किरण स्प्रेक्टोग्राफवर पडले आणि त्यांचा स्पेक्ट्रम तयार झाला. हे करताना

काही नवीन रेषा बाहेर पडतात हे त्यांच्या लक्षात आले, त्यांना रामन लाइन्स हे नाव दिले गेले. आपल्या प्रयोगाचे निष्कर्ष त्यांनी १६ मार्च १९२८ ला शास्त्रज्ञांच्या सभेत जाहीर केले आणि याबद्दल त्यांना १९३० चे नोबेल पारितोषिक मिळाले. पुढे २००० रासायनिक संयुगांच्या पृथःक्करणासाठी या संशोधनाचा उपयोग झाला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे हा शोध लावण्यासाठी त्यांनी जी सामुग्री वापरली ती इतकी साधी होती की तिची किंमत फक्त रु. २०० होती. आज रामन इफेक्टरवर पुढील संशोधनासाठी कोट्यावधीची उपकरणे, सामुग्री वापरली जाते. रामन इफेक्टशिवाय कॉस्मिक रेडिएशन, व्हायब्रेशन, ऑप्टिक्स या विषयांतही डॉ. रामन यांचे योगदान आहे.

फिजिक्समधील नोबेल पुरस्काराशिवाय डॉ. रामन यांना फ्रँकलिन मेडल (१९४१), भारतरत्न (१९५४), लेनिन शांतता पुरस्कार (१९५७) असे अनेक पुरस्कर मिळाले. डॉ. विक्रम साराभाई, डॉ. जी. एन. रामचंद्रन हे त्यांचे विद्यार्थी. विज्ञानाच्या विद्यार्थ्यांना डॉ. रामन यांचे सांगणे असे की शास्त्रीय संशोधनासाठी स्वतंत्र विचार करण्याची प्रवृत्ती आणि भरपूर कष्ट करण्याची तयारी हवी. साधन सामुग्रीपेक्षा या गोष्टींवर भर द्या.

या वर्षी २८ व २९ फेब्रुवारी असे दोन दिवस सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील आंतरविद्यापीठीय खगोलविज्ञान आणि खगोलभौतिकी केंद्र- आयुका (Inter University Centre for Astronomy and Astrophysics) येथे सर्वांसाठी विज्ञानप्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. डॉ. जयंत नारळीकरांनी हे केंद्र सुरु केले आहे. आर्यभट, गॅलीलिओ गलिली, आयझॅक न्यूटन, आल्बर्ट आइनस्टाइन या चार श्रेष्ठ वैज्ञानिकांचे शोध व त्यांच्या कार्याचा परिचय, फुकॉल्ट पेंड्युलम (लोलक), खगोलीय स्पेक्ट्रोस्कोपी, लायगोचे प्रतिरूप, एक्स्ट्रोसेटचे कार्य, सापेक्षता सिध्दांताची शताब्दी व त्यावर अधिक माहिती, गुरुत्वाकर्षणाचे तरंग, न्यूट्रिनो अशा अनेक विषयांवर तेथे सतत, भरपूर माहिती दिली जात होती.

पुणे जिल्ह्यातील नारायणगांव जवळील खोडद येथे GMRT (Giant Meterwave Radio Telescope) टाटा मौलिक संशोधन केंद्राद्वारे बसवलेली आहे. नॅशनल सेंटर फॉर रेडिओ ॲस्ट्रोफिजिक्स तर्फे येथे प्रतिवर्षी राष्ट्रीय विज्ञान दिवशी, मोठी राष्ट्रीय शास्त्रजत्रा भरवली जाते. इथे शाळांतर्फे शास्त्रीय प्रोजेक्टचे प्रदर्शनही भरवले जाते. हजारो शालेय विद्यार्थी आपल्या शिक्षक व पालकांसह या विज्ञान तीर्थाला भेट देतात. रात्री नभांगणातील ताऱ्यांच्या निरीक्षणाचीही सोय असते. या दोन्ही ठिकाणाच्या सर्व सोयी विनामूल्य आहेत.

विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानभक्ती, ज्ञानतृष्णा वाढावी, संशोधनाबद्दल आकर्षण निर्माण व्हावे म्हणून सर्व शाळांनी, माध्यमिक, उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय विज्ञान दिवस राखून ठेवला पाहिजे, तरच नवी पिढी अधिक विज्ञाननिष्ठ व संशोधक वृत्तीची होईल.

**गुडी पाडवा**
**८ एप्रिल २०१६**

# महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे

**संचालक : प्रा. राजेंद्र सं. कांबळे**
**प्राचार्य : डॉ. टी. आर. गोराणे**

### जागतिक महिला दिनी पुस्तक संच देऊन शिक्षिकांचा सन्मान

'जागतिक महिला दिनाचे' औचित्य साधून मंगळवार दि. ८ मार्च २०१६ रोजी विद्यालयात सर्व शिक्षिकांचा डॉ. नरेंद्र दाभोलकर लिखित एक पुस्तक व 'भारतीय संविधानाचे अंतरंग' ही पुस्तिका देऊन प्रा. डॉ. गोराणे यांचे हस्ते सन्मान करण्यात आला. भारतीय संविधानातील मूल्ये शिक्षिकांनी विद्यार्थ्यांपर्यंत जाणीवपूर्वक रुजवावीत. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा शिक्षणप्रसाराचा वारसा पुढे न्यावा असे आवाहन प्राचार्य डॉ. टी. आर. गोराणे यांनी सर्वांना केले.

### जलजागृती सप्ताह साजरा

दि. १६ ते २२ मार्च २०१६ हा सप्ताह विद्यालयात 'जल-जागृती सप्ताह' म्हणून साजरा करण्यात आला. वर्गवार विद्यार्थ्यांच्या चित्रकला, वक्तृत्व, निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. पाणी शुद्धीकरण, पाणी प्रदूषण होण्याची कारणे, जलसंवर्धन, पाणी बचतीवरचे उपाय यावर विद्यार्थ्यांनी आपले विचार वक्तृत्वातून, निबंधातून व चित्राद्वारे प्रकट केले. प्रत्येक विद्यार्थ्याने पाण्याची बाटली सोबत आणावी. ओंजळीने पाणी पिऊ नये. पाण्याची बचत कशी करता येऊ शकते हे सप्रयोग दाखवण्यात आले.

### शैक्षणिक सहल

या वर्षीचे राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शन विद्या प्रतिष्ठान बारामती, जि. पुणे येथे भरले होते. विद्यालयातील विद्यार्थ्यांना सदर प्रदर्शन दाखविण्याच्या दृष्टीने त्या ठिकाणी शैक्षणिक सहल नेण्याचे नियोजन ठरले. वेळेअभावी विद्यार्थी संख्या कमी होती. मात्र राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शन पाहण्याची संधी सहभागी विद्यार्थ्यांना प्राप्त करून देण्यात आली. लहान शैक्षणिक प्रयोग, दररोजच्या व्यवहरातील विज्ञान, ऊर्जा, प्रदुषण व उपाय असे लहानमोठे सुमारे ४०० शैक्षणिक उपक्रम विद्यार्थ्यांना पहावयास मिळाले. त्यामुळे विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित होण्यास मदत होणार आहे. सदर शैक्षणिक सहलीचे संपूर्ण नियोजन सहाय्यक शिक्षक श्री. विठ्ठल अनभुले व श्री. संजय म्हवाण यांनी केले.

### इ. १२ वी च्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

विद्यालयाच्या एम.सी.व्ही.सी. विभागातील इयत्ता १२ वी च्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ घेण्यात आला. श्री. एम. आर. वाघमोडे यांनी प्रास्ताविकात विविध शासकीय तांत्रिक कोर्सेसची माहिती विद्यार्थ्यांना दिली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. टी. आर. गोराणे यांनी समाजाभिमुख व्यवसाय निवडताना पर्यावरण व व्यावसायिक नैतिकता बाळगण्याचे भान ठेवण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. या कार्यक्रमासाठी शिक्षक श्री. अरविंद तुर्वणकर, श्री. रमेश चौधरी, श्री. अविनाश लाड उपस्थित होते. सर्व उपस्थितांना अल्पोपहार देण्यात आला.

लोकायत - संस्थेतर्फे पर्यावरण जागृती कार्यक्रम दि. २.३.२०१६ रोजी विद्यालयात इ. ९ वी च्या वर्गासाठी 'आपलं आरोग्य व संपत्ती लुटणाऱ्या कोक-पेप्सी बाबत' जनजागृती करण्यासाठी 'लोकायत' या सामाजिक संस्थेमार्फत डॉक्युमेटरी फिल्म दाखविण्यात आली. बाजारात सहज उपलब्ध होणाऱ्या या रासायनिक विषारी शीतपेयांबाबत विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. काही प्रात्यक्षिकेही या वेळी सादर करण्यात आली.

***

**दिनांक १ मे २०१० पासून**
**समाचार मासिकाचे वर्गणीत बदल**

- समाचार मासिकाची वार्षिक वर्गणी रुपये १००/-
- आजीवन सदस्यत्व वर्गणी (२० वर्षासाठी ) फक्त रुपये १,०००/- आकारण्यात येईल.
- आपण वर्गणी भरली नसल्यास पाठवावी.

# महाराष्ट्र मुद्रण तंत्र संस्था, पुणे

**संचालक : प्रा. राजेंद्र सं. कांबळे**
**प्र. प्राचार्य : प्रा. पी. व्ही. शिंदे**


कु. रुची महेंद्र अभंग

मुद्रण पदविका अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षात शिकणारी कु. रुची महेंद्र अभंग हिचे पुर्नगुणमूल्यांकनामध्ये गुण वाढल्याने निकालपत्रकामध्ये थोडा बदल होऊन तिने ८५.२% गुणासह प्रथम क्रमांक मिळविला. **संस्थेच्या वतीने तिचे हार्दिक अभिनंदन!**

फेब्रुवारी महिन्यामध्ये महाराष्ट्र मुद्रण तंत्र संस्थेच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी सॉफ्ट स्कील प्रोग्रॅमचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये आर्ट ऑफ लिव्हींग तसेच व्यवस्थापन व विक्री कौशल्य इत्यादीचा समावेश होता.

आर्ट ऑफ लिव्हींगच्या श्री. शिव गिरी या योग प्रशिक्षकाने तसेच त्यांच्या सहकार्यांनी सदर कोर्ससाठी विशेष मेहनत घेतली. आर्ट ऑफ लिव्हींगच्या सुरुवातीच्या सत्रामध्ये योगासने, सूर्यनमस्कार, सुदर्शन क्रीया तसेच श्वसनक्रीया नियंत्रित ठेवणे इत्यादिचे प्रशिक्षण देण्यात आले. त्यानंतर मॅनेजमेंट आणि सेल्समनशिप कौशल्यावर प्रात्यक्षिकासह माहिती देण्यात आणि त्यामध्ये आयुष्यात वेगवेगळ्या स्तरावर येणाऱ्या समस्या व ताण तणावांना आत्मविश्वासाने कसे सामोरे जावे याचे शिक्षण विद्यार्थ्यांना मिळाले. याचा फायदा भविष्यात विद्यार्थ्यांना होणार आहे. सदर प्रशिक्षणामध्ये सर्व विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहाने भाग घेतला. कारण विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारच्या खेळांच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. तसेच संघटन कौशल्य विकास, समूहाने एकत्र चर्चा करुन एखादे ठरवून देलेले उद्दिष्ट ठराविक कालमर्यादेत कसे साध्य करावयाचे ? याचे प्रशिक्षण दिले गेले (टिम वर्क व टास्क वर्क) तसेच विद्यार्थ्यांच्या विविध गटांमध्ये एक दिवस पाक क्रिया कौशल्यावर स्पर्धा घेण्यात आली. त्यामुळे संपूर्ण एक महिना विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने अतिशय उत्साहाने व आनंदाने सहभाग घेतला.

**अभिनव कला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची महाराष्ट्र मुद्रण तंत्र संस्थेस शैक्षणिक भेट**

दि. ८ मार्च २०१६ रोजी अभिनव कला महाविद्यालय, टिळक रोड, पुणे येथील इंटरमिजिएट अप्लाईड आर्ट च्या द्वितीय वर्षात शिक्षण घेत असलेले ५५ विद्यार्थी / विद्यार्थिनी, त्यांचे २ शिक्षक यांनी महाराष्ट्र मुद्रण तंत्र संस्थेस शैक्षणिक भेट दिली. मुद्रण तंत्राविषयी माहिती करुन घेणे हा या भेटीचा उद्देश होता.

या विद्यार्थ्यांना प्रा. अक्षय रावेतकर यांनी मुद्रण तंत्राची माहिती देऊन या भेटीचे संयोजन केले.

**औद्योगिक कंपनीस भेट**

✻ दि. ५ व १२ मार्च २०१६ रोजी महाराष्ट्र मुद्रण तंत्र संस्थेच्या प्रिंटिंग डिप्लोमाच्या द्वितीय वर्षाच्या ६० विद्यार्थी / विद्यार्थिनींनी ॲक्युप्रिंट सिस्टिम प्रा. लि., तळोजा एम.आय.डी.सी., पनवेल या नामांकित कंपनीस शैक्षणिक भेट दिली. ॲक्युप्रिंट सिस्टिम प्रा. लि. ही कंपनी ग्रॅव्हिअर सिलेंडर तयार करण्यामध्ये अग्रगण्य असून दरवर्षी प्लेसमेंट इंटरव्ह्यू साठी येत असते. सदर भेटीसाठी येण्या-जाण्याचा खर्च कंपनीतर्फे केला जातो. या भेटीसाठी विद्यार्थ्यांबरोबर प्रा. अक्षय रावेतकर, श्री. सिध्दार्थ बावीस्कर, श्री. राजाराम गभाले व सौ. प्रिती पेठकर हे गेले होते.

✻ दि. २.३.२०१६ रोजी प्रिंटिंग च्या प्रथम वर्षाच्या ५० विद्यार्थ्यांनी युनिक लेबल्स्, पुणे या कंपनीस शैक्षणिक भेट दिली. युनिक लेबल्स् ही कपंनी डायल प्रिंटिंग स्क्रिन प्रिंटिंगच्या सहाय्याने करणारी अग्रगण्य कंपनी आहे. निदेशक श्री. एस. बी. सहस्त्रबुध्दे हे यावेळी विद्यार्थ्यांबरोबर गेले होते.

✻✻✻

# मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय

**संचालक : श्री. न. सु. मुजुमदार**
**कार्यवाह : प्रा. राजेंद्र कांबळे**
**उपकार्याध्यक्ष : श्री. एस. एम. जिर्गे**

**मुख्याध्यापिका : सौ. राजेश्री काकडे**
**प्र. प्राचार्या : सौ. नूतन बापट**

### अभिनंदनीय

✲ महाराष्ट्र राष्ट्रभाषा पुणे आयोजित ५४ वी **महाराष्ट्र -गुजरात संयुक्त हिंदी वक्तृत्व स्पर्धा राज्यस्तरावर** दि. १३ जानेवारी २०१६ रोजी आयोजित केली होती. संपूर्ण महाराष्ट्रातून इयत्ता ६वी ते १०वी च्या वर्गातील एकूण ३० स्पर्धकांनी यात भाग घेतला होता. शाळेतील **इयत्ता ६वी तील कु. सृष्टी साळुंखे** हिला **तृतीय क्रमांक, प्रशस्तीपत्रक व रोख पारितोषिक** मिळाले.

✲ पुणे रिजनल इंडियन नॅशनल ब्रेन बी यांचेतर्फे ग्लोबल हॉस्पिटल येथे दि. १७ जानेवारी २०१६ रोजी स्पर्धा घेण्यात आली. चि. सर्वेश आनंदास या इयत्ता ११वी मधील विद्यार्थ्यास सहभागाबद्दलचे प्रमाणपत्र मिळाले.

### उपक्रम

प्राथमिक विभागातील इयत्ता १ली ते ४थी च्या विद्यार्थ्यांसाठी सहलींचे खालीलप्रमाणे आयोजन करण्यात आले होते.

| इयत्ता | दिनांक | स्थळ |
|---|---|---|
| १ली | २०.१.२०१६ | संस्कृती रिसोर्ट |
| २री | १९.१.२०१६ | हिडन ऑॲसिस |
| ३री | २१.१.२०१६ | शांतीवन रिसोर्ट |
| ४थी | २२.१.२०१६ | लेखा फार्म व पारलेजी बिस्किट फॅक्टरी |

पुण्यातील गुरुत्व या संस्थेतर्फे दि. २३ व २४ जानेवारी २०१६ रोजी राष्ट्रीय शैक्षणिक कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. दि. २३ जानेवारी रोजी नेतृत्त्वगुण व जीवनमूल्य या विषयावर तर दि. २४ जानेवारी रोजी अभिनव पद्धतीने पदार्थ विज्ञानाचे वर्ग अध्यापन या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. पहिल्या दिवशी शाळेच्या उप-मुख्याध्यापिका सौ. हेमांगिनी इनामदार व कनिष्ठ महाविद्यालय प्रमुख सौ. मीना राणे या कार्यशाळेस उपस्थित होत्या. दुसऱ्या दिवशी पदार्थ विज्ञानाच्या अध्यापिका सौ. अंजली जोशी, सौ. अश्विनी सहस्त्रबुद्धे, सौ. किशोरी जगदाळे, सौ. प्रिती मराठे या उपस्थित होत्या.

### सण-समारंभ

दि. १४ जानेवारी २०१६ रोजी शाळेमध्ये इयत्ता १०वी च्या विद्यार्थी व पालक यांचेसाठी सुप्रसिद्ध **व्यवसाय मार्गदर्शक डॉ. विवेक वेलणकर यांचे 'इयत्ता १०वी नंतरच्या वाटा' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन** करण्यात आले होते. पर्यवेक्षिका सौ. नूतन नेऊरगांवकर यांनी पुष्पगुच्छ देऊन प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. अध्यापिका सौ. विजया काळे यांनी डॉ. विवेक वेलणकर यांचा परिचय करुन दिला. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणातून दहावीनंतर विज्ञान, कला व वाणिज्य या शाखांमार्फत विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या विविध संधींबाबत मार्गदर्शन केले. क्षेत्र निवडताना आपली आवड व बुद्धिमता या दोनही गोष्टी लक्षात घेणे आवश्यक आहे असे त्यांनी प्रतिपादन केले. या नंतर विद्यार्थी व पालकांनी विचारलेल्या अनेक शंकांचे त्यांनी निरसन केले.

अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सभागृहात दि. १८ जानेवारी २०१६ रोजी इयत्ता ६वी व ७वी च्या फक्त विद्यार्थिनीं व त्यांच्या पालक मातांसाठी आई-मुलगी - स्वच्छता व आरोग्य या विषयावर प्रॉक्टर अँड गॅम्बल यांनी व्याख्यान आयोजित केले होते. डॉ. रश्मी कदम यांनी वाढत्या वयातील मुलींच्या आरोग्यविषयक व स्वच्छतेविषयक समस्या व त्यांचे निरसन या विषयावर उपस्थित विद्यार्थिनी व माता पालक यांना

मार्गदर्शन केले.

दि. १९ जानेवारी २०१६ रोजी शाळेत तिळगूळ समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. सुप्रसिद्ध लेखिका सौ. मृणालिनी चितळे यांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांनी गायलेल्या 'मन मंदिरा' या ईशस्तवनाने झाली. पर्यवेक्षिका सौ. नूतन नेऊरगावकर यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले व त्यांचा परिचय करुन दिला. सौ. मृणालिनी चितळे या महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेचा संचालिका असून त्यांची अनेक पुस्तके, कथासंग्रह स्वरुपात प्रसिद्ध झालेली आहेत. असे सुविद्य व बहुरंगी व्यक्तिमत्व या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून लाभल्याबद्दल सौ. नेऊरगावकर यांनी आनंद व्यक्त केला.

प्राचार्या सौ. नूतन बापट यांनी प्रमुख पाहुण्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला. संचालक श्री. न. सु. मुजुमदार यांनी पर्यावरणपूरक असे रोप देऊन तर उपप्राचार्या सौ. हेमांगिनी इनामदार यांनी तिळगूळ देऊन स्नेह वृद्धिंगत व्हावा अशी इच्छा व्यक्त केली.

शाळेतील इयत्ता ५वी ते ८वी च्या वर्गप्रतिनिधींनी तसेच शिक्षक प्रतिनिधींनी पाहुण्यांच्या हस्ते तिळगूळ स्वीकारला. या नंतर सौ. मृणालिनी चितळे यांनी मंगेश पाडगावकरांच्या भाजलेल्या वांग्याची गोष्ट ही कविता म्हणून दाखविली. त्यानंतर पोलिओग्रस्त वासंती इनामदार-जोशी यांनी स्वत: या व्याधीने ग्रस्त असतानाही कशाप्रकारे जिद्दीने शिक्षण पूर्ण केले व स्व:ताच्या अपंगत्वावर मात करत विजय मिळविला याचे उदाहरण आपल्या भाषणातून दिले. याशिवाय विद्यार्थ्यांनी आपला कल ओळखून त्यानुसार आपल्या भविष्याच्या वाटा ठरवाव्यात असे त्यांनी प्रतिपादन केले.

पर्यवेक्षिका सौ. एव्हरिल परेरा यांनी आभार प्रदर्शन केले. विद्यार्थ्यांनी गायलेल्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

जर्मन विषयाची **'पाश'** ही पुण्यातील कार्यरत संस्था असून त्यांनी एशियातील प्राचार्यांचा परिसंवाद आयोजिला होता. हा परिसंवाद दि. २१ जानेवारी ते २४ जानेवारी २०१६ या कालावधीत मलेशियातील क्वालालांपूर येथे संपन्न झाला. जर्मन ही भाषा शालेय स्तरावर शिकविण्यात येते. या भाषेच्या संवर्धनासाठी कोणकोणते शैक्षणिक उपक्रम राबविले जातात याची माहिती सदर परिसंवादात दिली गेली. भविष्यात ही भाषा ज्ञात असलेल्या विद्यार्थ्यांना कोणत्या संधी उपलब्ध असतील या विषयाची चर्चा देखील सदर परिसंवादात झाली. **प्राचार्या सौ. नूतन बापट यांनी या परिसंवादास उपस्थित राहून शाळेचे प्रतिनिधित्व केले.** दरवर्षी आशियातील प्राचार्यांची सहविचार सभा पाश या संस्थेतर्फे आयोजित करण्यात येते.

दि. २६ जानेवारी २०१६ रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजवंदनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. **अखिल भारतीय नाटय परिषदेच्या पुणे शाखेचे अध्यक्ष डॉ. सतीश देसाई** हे कार्यक्रमास **प्रमुख पाहुणे** म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. एन.सी.सी.च्या विद्यार्थिनींनी संचलन केले. विद्यार्थी समूहाने यानंतर अनेकता में एकता, 'हिंद की विशेषता' हे देशभक्तीपर गीत सादर केले. उप-प्राचार्या सौ. हेमांगिनी इनामदार यांनी प्रास्ताविक केले. पर्यवेक्षिका सौ. एव्हरिल परेरा यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. कार्याध्यक्ष श्री. रामचंद्र शेटे यांनी शाल व श्रीफळ देऊन पाहुण्यांचा सत्कार केला.

पाहुण्यांच्या हस्ते शाळेत १००% उपस्थिती असणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रशस्तीपत्रक देऊन कौतुक करण्यात आले. यावेळी पाहुण्यांच्या हस्ते आंतरशालेय हस्तलिखित स्पर्धेत चारही गटाच्या हस्तलिखितांचे प्रकाशन झाले. या स्पर्धेत बोस गट विजयी ठरला. या नंतर प्रमुख पाहुण्यांनी आपले विचार विद्यार्थ्यापर्यंत

सोप्या व मार्मिक भाषेत पोहोचविले. आजच्या विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच व्यवहाराचे ज्ञानही कसे आवश्यक आहे हे त्यांनी नमूद केले. तसेच शिक्षक ज्याप्रमाणे शैक्षणिक ज्ञान विद्यार्थ्यांना देतात त्याचप्रमाणे त्यांनी व्यवहारातही विद्यार्थ्यांना तरबेज करावे अशी विनंती शिक्षक वर्गाला केली. पर्यवेक्षिका सौ. उत्कर्षा केणी यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. या प्रसंगी संस्थेचे सर्व पदाधिकारी तसेच अभियांत्रिकी महाविद्यालयातील कर्मचारी वर्ग व शाळेतील सर्व विभागातील कर्मचारी वर्ग उपस्थित होता. वंदे मातरमने कार्यक्रमाची सांगता झाली.

**अभिनंदनीय**

शाळेत चालविण्यात येणाऱ्या भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या केंद्रातील खेळाडू कु. देवयानी कोलते हिने औरंगाबाद येथे दि. ३०.१.२०१६ ते १.२.२०१६ या दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय जिम्नॅस्टिक्स स्पर्धेत सर्वसाधारण विजेतेपदाचे रौप्यपदक मिळविले. कु. देवयानी हिला छत्रपती पुरस्कार विजेते प्रशिक्षक श्री. रामकृष्ण लोखंडे यांचे मार्गदर्शन लाभले. तिच्या या यशाबद्दल शाळेच्या दोनही विभागाच्या प्राचार्या सौ. नूतन बापट व सौ. राजेश्री काकडे यांनी कौतुक करुन तिला पुढील कामगिरीसाठी शुभेच्छा दिल्या.

इयत्ता ८वी तील विद्यार्थिनी कु. कनिष्का ढोले हिने शॉटपुट, थाळीफेक या क्रीडा प्रकारात नैपुण्य मिळविले. दि. २८ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०१६ दरम्यान कोझीकोडा, केरळ येथे संपन्न झालेल्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमधे तिने हे यश संपादन केले. कु. कनिष्काने शॉटपुटमधे रजत पदक व वैयक्तिक ट्रॉफी मिळविली.

**उपक्रम**

शुक्रवार दि. २९ जानेवारी २०१६ रोजी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सभागृहात इयत्ता ९वी च्या विद्यार्थ्यांसाठी **मेजर मंदार पाटील** यांचे **'देशभक्ती व सैन्यातील सेवेच्या संधी'** या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. पर्यवेक्षिका सौ. नूतन नेऊरगावकर यांनी पाहुण्यांची ओळख करुन दिली. पर्यवेक्षिका सौ. एव्हरिल परेरा यांनी पाहुण्यांचा सत्कार केला. मेजर पाटील यांनी बिझनेस ॲडमिनीस्ट्रेशनचे उच्च शिक्षण घेतलेले आहे. २००२ साली मिलीटरी ॲकेडमी डेहरादून येथे त्यांची ऑफिसर म्हणून निवड झाली. इंडोचायना सीमेवर त्यांनी देशरक्षण केले. केवळ १५ ऑगस्ट व २६ जानेवारी या दिवशी एकत्र येऊन ध्वजवंदन करणे म्हणजे देशभक्ती करणे नव्हे तर प्रत्येक सैनिक त्याच्या कार्यकालात ज्या पद्धतीने देशाचे रक्षण करतो ती खरी देशभक्ती असे त्यांनी नमूद केले. परमवीरचक्र मिळविणारे हमीद अली यांच्या १९६३ च्या युद्धापासून ते कारगिल युद्धापर्यंत सैनिकांनी प्रतिकूल परिस्थितीतही कशाप्रकारे आपले मातृभूमीप्रती प्रेम व कर्तव्य निभावले ते पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनद्वारे दाखविले. मुलांना सैन्यातील नोकऱ्यांच्या उपलब्ध संधीबद्दलही त्यांनी मार्गदर्शन केले तसेच यावेळी त्यांनी त्यांच्या १३ वर्षांच्या कारकीर्दितले अनेक अनुभव सचित्र वर्णन केले. विद्यार्थी चि. पार्थ ठाकरे याने आभार मानले.

दि. २ ते १० फेब्रुवारी २०१६ दरम्यान इयत्ता १ली ते ४थी च्या विद्यार्थ्यांसाठी good touch and bad touch या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. स्पर्शातून चांगला व वाईट स्पर्श कसा ओळखावा? हे प्रोजेक्टरच्या साहयाने दाखविण्यात आले.

कोणताही शारिरीक गैरवर्तनाचा प्रसंग आल्यास त्याला कसे तोंड द्यावे? हे विद्यार्थ्यांना सांगण्यात आले. तसेच आपतकालिन स्थितीत चाईल्ड हेल्पलाईनचा क्रमांक विद्यार्थ्यांना पाठ करावयास देण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन शाळेतील समुपदेशिका सौ. मधुरा काळे यांनी केले होते.

दि. ६ फेब्रुवारी २०१६ रोजी दहावीच्या मुलांचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला. काही

विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी प्राचार्या, उप-मुख्याध्यापिका, वर्गशिक्षिका यांनी सर्व विद्यार्थ्यांना परीक्षेसंदर्भात सूचना दिल्या. संचालक श्री. न. सु. मुजुमदार यांनी मुलांना उपदेशपर भाषण केले. अल्पोपहारानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

शनिवार दि. १३ फेब्रुवारी २०१६ रोजी प्लॅस्टिक मुक्त दिन साजरा करण्यात आला. शाळेतील एकूण ५० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी शाळेच्या आवारातील प्लॅस्टिक उचलून आवार प्लॅस्टिक मुक्त केले. मुलांचे गट करण्यात आले व सदर उपक्रम राबविला गेला. यानंतर मुलांनी स्वच्छतेची शपथ घेतली. प्लॅस्टिक मातीत विरघळू शकत नाही, परिणामी ते मातीत तसेच राहते. या मातीशी संपर्क आल्यामुळे अनेक जनावरांना त्रास होतो, तसेच मातीचा कसही कमी होतो या धोक्याची सर्वांना जाणीव करुन देण्यात आली.

शनिवार दि. २० फेब्रुवारी २०१६ रोजी मुक्तांगण इंग्लिश स्कूल येथे वृक्षदिंडीचे आयोजन करण्यात आले होते. रोटरी क्लब ऑफ पुणे मिडटाऊन व मुक्तांगण इंग्लिश स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने या दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. इयत्ता ८वी व ९वी मधील सुमारे १०० विद्यार्थी, रोटरी क्लब ऑफ पुणे मिडटाऊनचे सभासद व पदाधिकारी तसेच शाळेतील अध्यापक वर्ग यांनी या दिंडीत उत्साहाने सहभाग घेतला. **प्रसिद्ध अभिनेत्री व शाळेची माजी विद्यार्थिनी नेहा गद्रे हिने या कार्यक्रमास हिरवा झेंडा दाखवून दिंडीस प्रारंभ केला.** या दिंडीचा मार्ग शिवदर्शन, गजानन महाराज चौक, सारंग, अरण्येश्वर देऊळ, तावरे बेकरी चौक, शाळा असा होता. या दिंडीत पर्यावरणाविषयी जनजागृती, वृक्ष संवर्धनाद्वारे प्रदूषण नियंत्रण, स्वच्छ पुणे-सुंदर पुणे, रहदारीचे नियम पाळणे असे अनेक सामाजिक विषय सामावले होते. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या फलकांद्वारे वरील सर्व विषयांवरील संदेश लोकांपर्यंत पोहचविण्यात आले.

विद्यार्थ्यांनी दिंडीच्या मार्गक्रमणेत रहिवाशांना रोपांचे वाटप करुन हरित पर्यावरणाचा संदेश दिला. तसेच या दिंडीद्वारे स्मार्ट सिटीचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी कशा प्रकारे काम केले पाहिजे या संदर्भात जनजागृती करण्यात आली.

शनिवार दि. २७ फेब्रुवारी २०१६ रोजी शाळेत मराठी व विज्ञान दिन साजरा करण्यात आला. यावेळी दोनही विषयांशी निगडीत **डॉ. अनिल अवचट** यांना **प्रमुख पाहुणे** म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. प्राचार्या सौ. नूतन बापट यांनी पाहुण्यांचे शाल व रोप देऊन स्वागत केले. इयत्ता ९वी मधील विद्यार्थी चि. पार्थ ठाकरे याने प्रमुख पाहुण्यांचा परिचय करुन दिला. इयत्ता ९वी मधील विद्यार्थिनी कु. आसावरी बापट हिने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. आपल्या सूत्रसंचालनात तिने मराठी व विज्ञान दिनाचे महत्त्व विषद केले. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणात मराठी व विज्ञान हे दोनही विषय कसे महत्त्वाचे आहेत हे सोदाहरण पटवून दिले. मराठी माध्यमातून शिकलेले अनेक जण विज्ञान शाखेतही कार्यरत आहेत असे त्यांनी सांगितले. स्वत: वैद्यकीय व्यवसायात असून ते व्यसनमुक्ती सारख्या अत्यंत महत्त्वाच्या सामाजिक कार्याशी निगडीत आहेत. इयत्ता ८वी तील कु. शर्वरी गानू हिने आभार प्रदर्शन केले.

मराठी दिनाचे औचित्य साधून लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि. या बँकेने शाळेतील काही विद्यार्थी-विद्यार्थिनी तसेच शिक्षक यांचे बरोबर प्रसिद्ध लेखक व संस्कृत भाषेचे अभ्यासक डॉ. वामन शंकर देशपांडे यांची भेट घेऊन त्यांचा पुष्पगुच्छ. शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला. त्यांनी यावेळी मुलांना महाभारतातील गोष्टी सांगितल्या. यावेळी शाळेतील १८ विद्यार्थी, पर्यवेक्षिका सौ. नूतन नेऊरगांवकर, अध्यापिका सौ. शर्मिला केळकर, सौ. प्राजक्ता कुलकर्णी उपस्थित होते. तसेच बँकेच्यावतीने शाळेतील मराठी विषयाच्या अध्यापिकांचाही याप्रसंगी सत्कार करण्यात आला. ***

## विज्ञान महाविद्यालय, पुणे

**संचालक : प्रा. राजेंद्र सं. कांबळे**

**प्र. प्राचार्या : सौ. रेखा जोशी**

### विद्यापीठ प्रात्यक्षिक परीक्षा

दि. २९ फेब्रुवारी ते दि. ४ मार्च २०१६ दरम्यान प्रथम वर्ष बी. एस्सी. (संगणकशास्त्र), दि. ७ मार्च ते दि. १४ मार्च २०१६ दरम्यान द्वितीय वर्ष बी. एस्सी. (संगणकशास्त्र) व दि. १५ मार्च ते दि. २३ मार्च २०१६ दरम्यान तृतीय वर्ष बी. एस्सी. (संगणकशास्त्र) या अभ्यासक्रमांच्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रात्यक्षिक परीक्षा सुरळीतपणे पार पडल्या.

### विद्यापीठ लेखी परीक्षा

दि. २२ मार्च २०१६ ते दि. १८ एप्रिल २०१६ या कालावधीमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या बी.एस्सी. (संगणकशास्त्र) या अभ्यासक्रमाच्या लेखी परीक्षा संपन्न होत आहेत.

### शारीरिक शिक्षण परीक्षा

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने प्रथम वर्ष बी.एस्सी. (संगणकशास्त्र) या अभ्यासक्रमासाठी प्रथमच सक्तीची केलेली शारीरिक शिक्षण परीक्षा दि. १५ मार्च २०१६ रोजी घेण्यात आली.

### Quick Heal Foundation Cyber Security Summit

Cyber Security Awareness अंतर्गत दि. ११ मार्च रोजी के. बी. जोशी इन्स्टिट्युट ऑफ इन्फॉरमेशन टेक्नोलॉजी यांनी आयोजित केलेला व यशवंतराव चव्हाण सभागृह येथे सर्व महाविद्यालये व Quick Heal Foundation Cyber Security दरम्यान सामंजस्य करार झाला. याप्रसंगी Quick Heal Foundation Cyber Security चे प्रमुख श्री. कैलास काटकर तसेच सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य व Placement Co-ordinators उपस्थित होते.

### Placement Cell

Placement Activity अंतर्गत महाविद्यालया मध्ये विविध IT कंपनीज्ना आमंत्रित करण्यात येते. यामध्ये शैक्षणिक वर्ष २०१५-१६ साठी माहे मार्च २०१६ मध्ये झालेली activity चा तपशील पुढील प्रमाणे -

| कंपनीचे नाव | निवड झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|
| Capgemini | बी. एस्सी. (संगणशास्त्र) - ०२ |

## आश्रमस्थ माजी विद्यार्थी, घाटकोपर, मुंबई शाखा

***स्नेहसंमेलन***

पुणे विद्यार्थी गृहाच्या घाटकोपर, मुंबई शाखेतील १९७७ ते १९९१ या कालावधीत वास्तव्यास असलेल्या आश्रमस्थ विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन दि.३ व ४ मार्च २०१६ रोजी संपन्न झाले. घाटकोपर शाखेच्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून हे संमेलन आयोजित करण्यात आले होते.

शुक्रवार दि.३ मार्च रोजी दु. ४ वाजता माजी विद्यार्थ्यांचे आगमन व्हायला सुरुवात झाली. चहापानानंतर नावनोंदणी झाली. मुंबई शाखेच्या विविध विभागांना विद्यार्थ्यांनी भेट दिली व प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले. सेमिनार हॉलमध्ये स्वपरिचयाचा कार्यक्रम पार पडला. भोजन झाल्यानंतर आश्रमस्थ विद्यार्थ्यांनी आपल्या आठवणी जागवल्या. मनोरंजनपर कार्यक्रमात काव्यवाचन करण्यात आले. मुक्कामाची व्यवस्था घाटकोपर शाखेत करण्यात आली होती.

शुक्रवार दि. ४ मार्च रोजी सकाळी नेरुळ शाखेस विद्यार्थ्यांनी भेट दिली. त्या ठिकाणी माजी विद्यार्थी मंडळ, मुंबई विभागाचे अध्यक्ष व संचालक डॉ. शं. पां. किंजवडेकर, संचालक श्री. दिनेश मिसाळ, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सर्व माजी विद्यार्थ्यांचे जंगी स्वागत केले. नेरुळ शाखेच्या विविध विभागांना भेट देऊन अल्पोपहार व चहापानानंतर सर्वजण घाटकोपर शाखेत परतले.

कृपया पुढील वृत्त पृष्ठ क्र. १५ वर पहावे

# विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर, मुंबई शाखा

**संचालक : प्राचार्य के. एन. शिरकांडे**
**संचालक : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

## प्राथमिक इंग्रजी
## मुख्याध्यापिका : सौ. शुभांगी जाधव

### चित्रकला स्पर्धा

दि. २६.१.२०१६ रोजी बॉम्बे कॅथलिक सभा यांच्यातर्फे आयोजित करण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला. स्पर्धेत सुयश प्राप्त केलेले विद्यार्थी पुढीलप्रमाणे :

| विद्यार्थ्यांचे नाव | इयत्ता | क्रमांक |
|---|---|---|
| कु. तनिष्का ठोमसे | इ. २ री | २ रा क्रमांक |
| कु. अनन्या रसाळ | इ. ४ थी | २ रा क्रमांक |
| कु. स्तव्या पद्मशाली | इ. ४ थी | ३ रा क्रमांक |
| कु. रश्मी वरे | इ. ४ थी | उत्तेजनार्थ |

### एन् वॉर्ड स्तरीय आंतरशालेय स्पर्धा

बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग अंतर्गत खाजगी प्राथमिक शाळा एन वॉर्ड स्तरीय आंतरशालेय स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत प्राथमिक इंग्रजी विभागाने १० पैकी ७ स्पर्धेत नाविन्यपूर्ण यश प्राप्त केले. शाळेला वॉर्ड स्तरीय **'आदर्श शाळा पुरस्कार'** देण्यात आला. स्पर्धेत नाविन्यपूर्ण यश प्राप्त केलेल्या व विद्यार्थ्यांची नावे पुढील प्रमाणे.

| विद्यार्थ्यांचे नाव | इयत्ता | स्पर्धेचे नाव | क्रमांक |
|---|---|---|---|
| कु. अक्षता पवार | १ली | कविता पाठांतर | प्रथम |
| कु. अनुष्का गाढवे | २री | चित्रकला | तृतीय |
| कु. श्रावणी कटाळे | ३री | टाकाऊ पासून टिकाऊ | तृतीय |
| कु. हर्षल ताटकर | ४थी | वक्तृत्व | प्रथम |

### नाट्य स्पर्धा

इयत्ता ३री, द्वितीय क्रमांक, सहभागी विद्यार्थी कु. संतोषी गवळी, कु. ऋतु अंबोलकर, कु. नंदिनी शेट्टी, कु. शुभ्रा सावंत, कु. गजराज मालवी, कु. सुबोध कुलकर्णी, कु. दिगंबर संसारे, कु. सोहम भोळे, कु. साहिल मुदगे, कु. ऋषील तांबे, कु. माही चव्हाण, कु. जान्हवी चौधरी.

### नृत्य स्पर्धा

इयत्ता ३री, प्रथम क्रमांक, सहभागी विद्यार्थी कु. पूजा जाधव, कु. गौरी गुजर, कु. रमा कांदळगावकर, कु. देवश्री भाटे, कु. भावना इंदप, कु. श्रध्दा अलीबादे, कु. दिपाली रेडीज, कु. विदुला घाग, कु. वेदांत दीक्षित, कु. वत्सल काळे

श्रीमती स्नेहा चिंतामणी राणे, प्राथमिक इंग्रजी विभागाच्या सहा. शिक्षिका यांनी क्रिएटीव्ह राईटींग स्पर्धेत ३रा क्रमांक पटकावला.

## विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय
## मुख्याध्यापिका : सौ. योगिनी पोतदार

### चित्रकला स्पर्धेत घवघवीत यश

चित्रकला ग्रेड परीक्षा, २०१५ मध्ये प्रशालेने घवघवीत यश संपादन केले. एलिमेंटरी परीक्षेचा निकाल १००% लागला. या परीक्षेस ५७ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी ७ विद्यार्थ्यांना अे ग्रेड तर २१ विद्यार्थ्यांना बी ग्रेड मिळाली. इंटरमिजिएट परीक्षेचा निकाल १००% लागला. या परीक्षेस २९ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी ४ विद्यार्थ्यांना अे ग्रेड तर १० विद्यार्थ्यांना बी ग्रेड मिळाली.

### मराठी भाषा दिन

दि. २७ फेब्रुवारी २०१६ रोजी ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त कवी कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनानिमित्त प्रशालेत मराठी दिन साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमात प्रथम कुसुमाग्रजांची महती सांगणारी ध्वनीचित्रफित दाखविण्यात आली. तसेच इ. ५वी ते ८वीच्या विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचा गौरव करणारी गीते, नृत्ये, भाषणे, एकपात्री प्रयोग, नाटके सादर केली. कुसुमाग्रज, मंगेश पाडगावकर व बहिणाबाई चौधरी यांच्या कवितांचे वाचनही केले.

## राष्ट्रीय विज्ञान दिन

राष्ट्रीय विज्ञान दिन दि. २८ फेब्रुवारी २०१६ रोजी विद्याभवन हायस्कूलच्या अप्पासाहेब गरगटे सभागृहात सकाळी ८ ते ९.३० या वेळेत साजरा करण्यात आला. मुख्याध्यापिका सौ. योगिनी पोतदार यांनी डॉ. सी. व्ही रामन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन कार्यक्रमाला सुरुवात केली. याप्रसंगी शास्त्रज्ञांची माहिती काही विज्ञान गीते व नाटिका यांच्या सहाय्याने दिली. अंधश्रध्दा, गैरसमजुती दूर करुन विद्यार्थ्यांचा वैज्ञानिक दृष्टीकोन वाढवण्याचा प्रयत्न केला गेला.

## एन वॉर्डस्तरीय समूहगीत स्पर्धा

एन वॉर्डस्तरीय सहशालेय उपक्रमांतर्गत दि. ५ ऑक्टोबर २०१५ रोजी घेण्यात आलेल्या समूहगीत स्पर्धेत प्रशालेला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. तसेच या विद्यार्थी गटाची जिल्हास्तरीय समूहगीत स्पर्धेसाठी निवड झाली होती. या स्पर्धेतील सहभागी विद्यार्थी पुढीलप्रमाणे - १) कु. गौरी रविंद्र पेंडसे २) कु. तरंगा गिरीश जोशी ३) कु. पूर्वा श्रीकांत जोशी ४) कु. पूजा गोरखनाथ माने ५) कु. दिपेश राम मेस्त्री ६) कु. श्रुती राजेश कांबळे ७) कु. अभिषेक शरद भिंगारदिवे तबलावादक - कु. सुमित जाधव, हार्मोनिअम वादक- कु. अनुज विधाटे

या विद्यार्थ्यांना प्रशालेतील सहा. शिक्षिका श्रीमती जोस्पीन डाबरे व श्री. रुपेश मांडवेकर यांनी मार्गदर्शन केले.

## गणित - विज्ञान Olympiad स्पर्धा

शैक्षणिक वर्ष २०१५-२०१६ मध्ये सिल्व्हर झोन, दिल्ली तर्फे गणित व विज्ञान ऑलिंपियाड स्पर्धा घेण्यात आली. प्रथम फेरीत गणित ऑलिंपियाड परीक्षेत ४ विद्यार्थ्यांनी सुवर्ण पदक तर विज्ञान ऑलिंपियाड स्पर्धा परीक्षेत ४ विद्यार्थ्यांनी सुवर्ण, २ विद्यार्थ्यांनी रौप्य तर २ विद्यार्थ्यांनी कांस्य पदक प्राप्त केले.

**Ist Level Maths Olympiad**

| | | | |
|---|---|---|---|
| कु. शिरसेकर स्वरांगी | ७०.५८३ | सुवर्ण | ६वी अ |
| कु. बोचरे उर्मिला | ५०.४२९ | सुवर्ण | ७वी ब |
| कु. ककुरले साहिल | ६०.५५६ | सुवर्ण | ९वी अ |
| कु. नागले दीपक | ६५.५२९ | सुवर्ण | १०वीअ |

**Ist Level Science Olympiad**

| | | | |
|---|---|---|---|
| कु. पटाडे चिन्मय | ५०.४०८ | सुवर्ण | ७वी अ |
| कु. नागले श्रेयस | ५०.४१९ | सुवर्ण | ८वी अ |
| कु. ककुरले साहिल | ५७.९२२ | सुवर्ण | ९वी अ |
| कु. नागले दीपक | ८८.२२१ | सुवर्ण | १०वी |
| कु. सुर्यवंशी आकांक्षा | ५७.८९४ | रौप्य | ९वी अ |
| कु. चव्हाण साहिल | ७३.१३५ | रौप्य | १०वी क |
| कु. तोत्रे सुरेंद्र | ५५.३९३ | कांस्य | ९वी अ |
| कु. रासकर सिद्धी | ६८.९७७ | कांस्य | १०वी अ |

## कचरा व्यवस्थापन समिती व्याख्यान

दि. १२.२.२०१६ रोजी सेमिनार हॉलमध्ये कचरा व्यवस्थापन या विषयावर इ. ८वीच्या विद्यार्थ्यांसाठी **पद्मश्री पुरस्कार विजेते BARC शास्त्रज्ञ डॉ. शरद काळे यांचे व्याख्यान** आयोजित केले होते. कोषाध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

डॉ. शरद काळे यांनी स्वानुभवातून अनेक जीवनोपयोगी वस्तूंचा व कचऱ्याचा संबंध कसा जोडता येईल याची उदाहरणे दिली. तसेच जेवणाच्या ताटापासून कचरा कुंडी पर्यंतचे व्यवस्थापन करुन आपल्या वृत्तीमध्ये बदल घडवण्याची गरज व्यक्त केली.

पावसाळयात पाणी निर्जंतुक करण्यासाठी शेवग्याच्या बियांची पावडर वापरावी तसेच प्लॅस्टिकच्या पिशव्या न वापरता कापडी पिशव्यांचा वापर करावा असे आवाहन केले.

विद्यार्थ्यांनी आपल्या विविध शंका उपस्थित करुन कार्यक्रमात सक्रीय सहभाग घेतला. डॉ. शरद काळे यांनी समर्पक उत्तरे देऊन विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. प्राथमिक इंग्रजी विभागाचे सहा. शिक्षक श्री. दिपक निचित यांनी आभार प्रदर्शन केले.

## व्यवसाय मार्गदर्शन व्याख्यान

दि. १ फेब्रुवारी २०१६ रोजी इ. १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी व्यवसाय मार्गदर्शनपर व्याख्यान

आयोजित केले होते. यावेळी अनेक व्याख्यात्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

श्री. चंद्रकांत मुंढे यांनी उत्तरपत्रिका आकर्षक स्वरुपात कशी सादर करावी याबद्दल व कलचाचणीविषयी माहिती दिली. श्री. प्रविण मेस्त्री यांनी विविध क्षेत्रातून उच्च माध्यमिक शिक्षण प्राप्त केल्यानंतर उपलब्ध असलेल्या संधीबद्दल माहिती दिली. तसेच श्री. कोरी यांनी टेक्सटाईल क्षेत्रातील विविध शाखांची माहिती व जगभरातील व्याप्ती याबाबत माहिती सांगितली. तसेच सौ. ज्योती निचित यांनीही विद्यार्थ्यांना योग्य व्यवसाय निवडीबाबत मार्गदर्शन केले. माजी विद्यार्थिनी कु. समृध्दी डोडल या पवई IIT च्या विद्यार्थिनीने IIT क्षेत्रात पदार्पण करण्यासाठी कठोर परिश्रम आवश्यक असल्याचे सांगितले.



कु. योगिता शिंगटे

**क्रीडावृत्त**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य व जिल्हा क्रीडा अधिकारी बीड यांनी २४ जानेवारी २०१६ ते २६ जानेवारी २०१६ रोजी **राज्यस्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धा** बीड या ठिकाणी घेतली होती. त्या स्पर्धेत विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाची विद्यार्थिनी **कु. योगिता भगवान शिंगटे इ. १०वी अ** हिने द्वितीय क्रमांक पटकाविला. या विद्यार्थीनीला क्रीडा शिक्षक श्री. आत्माराम माने यांनी मार्गदर्शन केले. **संस्थेच्यावतीने तिचे हार्दिक अभिनंदन !**

**विद्याभवन नं. २**
**मुख्याध्यापिका : सौ. अनुराधा मेहेंदळे**

मराठी दिन मराठी वाङ्मय मंडळातर्फे दि. २७ फेब्रुवारी रोजी मराठी दिन साजरा करण्यात आला. मुख्याध्यापिका सौ. अनुराधा मेहेंदळे यांनी कुसुमाग्रजांच्या प्रतिमेचे पूजन केले. त्यांच्या साहित्यावर आधारित काव्यवाचन, एकपात्री प्रयोग, समूहगीते असे कार्यक्रम विद्यार्थ्यांनी सादर केले. सहा. शिक्षिका श्रीमती मीना गायकवाड व श्रीमती मीनल भोळे यांनी कुसूमाग्रजांच्या कवितांचे वाचन व गायन केले.

**विज्ञान दिन**

दि. २९ फेब्रुवारी २०१६ रोजी प्रशालेत विज्ञानदिन साजरा करण्यात आला. इ. ५ वी ते ७वीच्या विद्यार्थ्यांनी विविध विषयांवरील सुमारे १०० विज्ञान प्रकल्प मांडले होते. यात सूर्यमाला, उर्जा, संतुलीत आहार, पचनसंस्था या विषयावरील तक्ते व मॉडेल ठेवण्यात आले होते. सर्व विद्यार्थी व शिक्षकांनी या प्रदर्शनाला भेट दिली.

**चित्रकला स्पर्धा**

दि. १४ फेब्रुवारी रोजी भारतीय युवा शक्ती तर्फे मातृदिनानिमित्ताने घेण्यात आलेल्या आंतरशालेय चित्रकला स्पर्धेत पुढील विद्यार्थ्यांनी बक्षिसे मिळविली.

| | | |
|---|---|---|
| शर्वरी संदिप तावडे | प्रथम क्रमांक | ६वी क |
| श्रुती संजय सावंत | द्वितीय क्रमांक | ६वी ड |

**विशेष उल्लेखनीय : माजी विद्यार्थी श्री. सागर नानासाहेब भानवसे यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे विक्रीकर निरीक्षक पदी निवड**



श्री. सागर भानवसे

श्री. सागर नानासाहेब भानवसे विद्याभवन घाटकोपर शाखेत छोटा शिशु ते इ. १०वी पर्यंत शिकत होता. तो मूळचा आटपाडी तालुक्यातील पिसेवाडीचा (आवळाई) रहिवाशी आहे. त्याचे वडील महाराष्ट्र पोलीस दलात कार्यरत आहेत. सागर अतिशय नम्र, मनमिळावू, मेहनती, अभ्यासू व शिक्षकप्रिय असून विद्याभवनशी व शिक्षकांशी नेहमीच संपर्कात असतो. अशा या माणदेशाच्या सुपुत्राची विक्रीकर निरीक्षक पदी झालेल्या निवडीबद्दल **विद्याभवन संकुलातर्फे हार्दिक अभिनंदन व त्याच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा !**

## जागतिक महिला दिन

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून दि. ८ मार्च २०१६ रोजी मराठी व इंग्रजी माध्यमाच्या महिला पालकांसाठी पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळ, मुंबई विभागातर्फे टाकाऊपासून टिकाऊ वस्तू तयार करणे ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. मराठी माध्यमाच्या १० व इंग्रजी माध्यमाच्या ६ पालकांनी सहभाग घेतला. स्पर्धेचे विजेते पुढीलप्रमाणे

| माध्यम | क्रमांक | पालकांचे नाव |
|---|---|---|
| मराठी | प्रथम | सौ. सुषमा विलास पाटील |
| | द्वितीय | सौ. सुहासिनी उदय पाटील |
| | तृतीय | सौ. अनिता मुकेश सताणे |
| इंग्रजी | प्रथम | सौ.संगीता मनोहर पाटील |
| | द्वितीय | सौ. शीतल संजय कदम |
| | तृतीय | सौ. स्वाती ज्ञानेश्वर जुजम |

या स्पर्धेचे परीक्षक म्हणून चित्रकलेतील तज्ञ मार्गदर्शक श्री. प्रकाश भिसे व चित्रकला शिक्षक श्री. अर्जुन मस्के यांनी काम पाहिले.

यावेळी काही पालकांनी व शिक्षकांनी महिला दिनाचे महत्व सांगणारी भाषणे, कविता सादर केल्या. कार्यक्रमाचे आयोजन सौ. कमल डहाके, सौ. मनिषा जायभाये व सौ. संगिता मुंढे यांनी केले होते.

## मुंबई शाखा भेट

दि. २३ फेब्रुवारी २०१६ रोजी संस्थेस थोर व्यक्तींच्या नावे सातत्यपूर्ण व भरीव देणगी देणारे संस्थेचे देणगीदार व हितचिंतक श्री. अमरेंद्र प्रभाकर गोरे यांनी मुंबई शाखेस सदिच्छा भेट दिली. संचालक प्राचार्य के. एन. शिरकांडे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. संचालक श्री. कृष्णाजी कुलकर्णी यांनी श्री. अमरेंद्र गोरे यांच्या कार्याचा परिचय करुन दिला. उपकार्याध्यक्ष प्राचार्य हणमंत भोसले यांनी श्री. अमरेंद्र गोरे यांच्या देणगी देण्याच्या हेतूबद्दल व ज्यांच्या स्मृतिनिमित्त देणगी दिलेली आहे त्याबद्दल त्यांच्या असणाऱ्या भावनांबद्दल आदर व्यक्त करुन संस्थेच्या वतीने आभार व्यक्त केले. यावेळी श्री. अमरेंद्र गोरे यांनी मुंबई शाखेच्या विविध विभागास भेट देऊन पाहणी केली. त्यांनी संस्थेच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केले. तसेच संस्थेचा आपल्याला नेहमीच चांगला अनुभव आल्याचे सांगितले. यावेळी त्यांच्या हस्ते मुंबई शाखेच्या नवीन शालेय बसचे पूजन करण्यात आले.

यावेळी कोषाध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, संचालक श्री. दिनेश मिसाळ व श्री. कृष्णाजी कुलकर्णी, सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. ✻✻✻

### Am| ‘ñW ‘mOr {dÚmWu KmQ>H$mna ñZhg‘bZ dÎm nð 11 déZ nT

मुंबई शाखा वर्धापन दिनानिमित्त कोषाध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांच्या हस्ते गणेशपूजन करण्यात आले. सेमीनार हॉलमध्ये माजी विद्यार्थी व तत्कालिन शिक्षक यांनी एकमेकांची विचारपूस केली व आपल्या आठवणी जागवल्या. याप्रसंगी श्रीमती रजनी तायवाडे, श्रीमती सरस्वती रामचंद्रन्, श्रीमती पुष्पा सुब्रमण्यम, श्रीमती सुनिता भिडे, श्रीमती अर्चना दामले, श्रीमती सरला नरेंद्रन् व श्रीमती प्रिया नाईक, हे तत्कालिन शिक्षक व शिक्षिका उपस्थित होत्या. सर्व आश्रमस्थ विद्यार्थ्यांनी संस्थेच्या प्रगतीसाठी तन मन धनाने मदत करण्याचे आश्वासन देऊन आपण दरवर्षी एकत्र येऊ असे सांगितले. दुपारी भोजनानंतर संस्थेची प्रगती व पुढील वाटचाल याबद्दल चर्चा होऊन विविध सूचना करण्यात आल्या. याप्रसंगी प्राचार्य के. एन. शिरकांडे, उपकार्याध्यक्ष श्री. सुभाष जिर्गे, कार्यवाह प्रा. राजेंद्र कांबळे, कुलसचिव श्री. सुनिल रेडेकर, कोषाध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, संचालक श्री. दिनेश मिसाळ, श्री. कृष्णाजी कुलकर्णी व श्री. अमोल जोशी, ज्येष्ठ माजी विद्यार्थी श्री. ल. दि. कुलकर्णी, डॉ. बा.गो. कुलकर्णी, डॉ. दिलीप कदम व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माजी विद्यार्थी श्री. तुकाराम दौंडकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी खूप मेहनत घेतली. दु. ४ वाजता श्री. हणमंतराव साळुंके यांच्या दापोली, जि. रत्नागिरी येथील फार्म हाऊसला भेट देण्यासाठी माजी विद्यार्थ्यांनी प्रयाण केले. ✻✻✻

# विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय,नेरूळ,नवी मुंबई शाखा

**संचालक : डॉ. शं. पां. किंजवडेकर**
**संचालक : श्री. दिनेश मिसाळ**

**प्राथमिक मराठी**
**मुख्याध्यापिका : सौ. सुवर्णा मिसाळ**

### अभिनंदनीय

दि. १३ फेब्रुवारी २०१६ रोजी डी. आर. पाटील प्राथमिक विद्यालय, तुर्भे येथे आंतरशालेय विविध स्पर्धांचे आयोजन केले होते. या स्पर्धांमध्ये विद्याभवन प्राथमिक मराठी शाळेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. **वक्तृत्व स्पर्धेमध्ये इ.४ थी मधील कु. प्रथम बाळू म्हसाडे** याने मातृभाषेतून शिक्षणाचे महत्त्व या विषयावर आपले विचार मांडून प्रथम क्रमांक मिळविला.

सकाळ समूहातर्फे विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन केले होते. खालील विद्यार्थ्यांनी चित्रकला स्पर्धेत सुयश संपादन केले.

| विद्यार्थिनीचे नाव | इयत्ता | क्रमांक |
|---|---|---|
| कु. लक्ष्मी गुलाब हुंडारे | ४थी | द्वितीय |
| कु. श्रेया दिनेश साळुंके | ४थी | उत्तेजनार्थ |
| कु. सोनाली संजय करंबेळे | ५वी | द्वितीय |

### शिवजयंती उत्सव

दि. १९ फेब्रुवारी २०१६ रोजी प्राथमिक मराठी विभागाने शिवजयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी केली. या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापिका सौ. सुवर्णा मिसाळ, सौ. उषा वामने व सर्व शिक्षकवृंद उपस्थित होता. मुख्याध्यापिका सौ. सुवर्णा मिसाळ यांच्या शुभहस्ते शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन कार्यक्रमाची सुरुवात झाली. विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांच्या पराक्रमाच्या कथा सांगितल्या. इ. ४थी च्या विद्यार्थ्यांनी पोवाड्याचे गायन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती नूतन गवांदे यांनी केले.

### पालकांसाठी उद्‌बोधनपर व्याख्यान

दि. २० फेब्रुवारी २०१६ रोजी प्राथमिक मराठीमध्ये पालकांसाठी उद्‌बोधनपर व्याख्यानाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमासाठी व्याख्याते म्हणून प्रसिध्द मानसोपचार तज्ञ डॉ. ओमकार माटे त्यांच्या सहकारी डॉ. प्रतिका पेटारे यांना निमंत्रित करण्यात आले होते. संचालक डॉ. शं. पां. किंजवडेकर, श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका सौ. सुवर्णा मिसाळ, मुख्याध्यापिका सौ. उषा वामने व पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. संचालक डॉ. शं. पां. किंजवडेकर यांनी डॉ. ओमकार माटे व त्यांच्या सहकारी श्रीमती प्रतिका पेटारे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. डॉ. ओमकार मोटे यांनी पालकांना मार्गदर्शन करताना सांगितले की हल्ली मुलांमध्ये आक्रमकता, चोरी करणे, खोटे बोलणे, अतिलाजाळूपणा, दादागिरी अशा प्रकारांमध्ये खूप वाढ झालेली आहे. तेव्हा पालकांनी मुलांशी वेळोवेळी संवाद साधायला हवा. त्यांना सकारात्मक प्रोत्साहन द्यायला हवे. संचालक डॉ. शं. पां. किंजवडेकर यांनी पालक मोठ्या संख्येने हजर राहिले त्याबद्दल त्यांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती नूतन गवांदे यांनी तर आभारप्रदर्शन श्रीमती राधिका भोसले यांनी केले.

### मराठी राजभाषा दिन

दि. २६ फेब्रुवारी २०१६ रोजी प्राथमिक मराठी विभागाने मराठी राजभाषा दिन साजरा केला. या कार्यक्रमास मुख्याध्यापिका सौ. सुवर्णा दिनेश मिसाळ व सौ. उषा वामने उपस्थित होत्या. मराठी दिनाचे औचित्य साधून इ. ३री व ४ थी च्या विद्यार्थ्यांनी मायबोलीचे वर्णन व प्रशंसा करणारी गीते सादर केली. इ. ५ वी त ७ वी च्या वर्गातील विद्यार्थ्यांनी मराठी भाषेची महती सांगणारी भाषणे केली. तर इ. ७वी च्या विद्यार्थ्यांनी स्वत: तयार केलेली हस्तलिखिते सादर केली. शिक्षिका श्रीमती नूतन गवांदे यांनी मराठी भाषेचा इतिहास थोडक्यात सांगितला.

### विज्ञान दिन

दि. २८ फेब्रुवारी २०१६ रोजी दिन साजरा केला. या कार्यक्रमास मुख्याध्यापिका सौ. सुवर्णा मिसाळ उपस्थित होत्या. या दिवसाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी स्वत: तयार केलेल्या विविध वैज्ञानिक प्रकल्पांचे प्रदर्शन या दिवशी भरविण्यात आले. विद्यार्थ्यांनी कल्पकतेने विविध प्रकल्प सादर केले. इ.३री व ४ थी च्या विद्यार्थ्यांचे विज्ञानावर आधारित चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. तसेच इ. ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांचे विज्ञानावर प्रश्न मंजूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विज्ञान दिनानिमित्त आयोजित या स्पर्धांमधील बक्षिसपात्र विद्यार्थी पुढील प्रमाणे

**चित्रकला स्पर्धा (इ.३ री ते ४ थी)**

| विजेत्यांची नावे | क्रमांक |
|---|---|
| कु. प्राजक्ता नरेश पमेर | प्रथम |
| कु. प्रिया प्रदीप कोपार्डे | द्वितीय |
| कु. यश त्रिंबक घाडगे | तृतीय |

**उत्कृष्ट प्रकल्प (इ. ४ थी)**

कु. श्रुती संदिप वाघुले
कु. श्वेता प्रभाकर फुले

**प्रश्नमंजूषा स्पर्धा (इ. ५ वी ते ७ वी)**

| | |
|---|---|
| कु. मधुरा महादेव बिराजदार | प्रथम |
| कु. जुई बारकू बोरचटे | द्वितीय |
| कु. ऋतुपर्ण सुबोध कोलते | तृतीय |

**उत्कृष्ट प्रकल्प (इ. ५ वी ते ७ वी)**

कु. मधुरा महादेव बिराजदार
कु. श्रध्दा संतोष सातपुते
कु. सेजल ज्ञानेश्वर गावडे
कु. सक्षम मंगेश वाटवे
कु. वेदांत विकास थोरात

### महिला दिन

दि. ८ मार्च २०१६ रोजी नवी मुंबई महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागातर्फे महिलादिनानिमित्त महिलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते या स्पर्धेमध्ये प्राथमिक मराठी विभागाच्या महिला शिक्षिकांनी गायन स्पर्धेत सहभाग घेऊन निसर्ग पोवाडा सादर केला. यामध्ये त्यांना द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

## प्राथमिक, माध्यमिक मराठी आणि उच्च माध्यमिक

### जागतिक महिला दिन

दि. ८ मार्च २०१६ रोजी विद्याभवन नेरुळ येथे महिला दिन अतिशय उत्साहात पार पडला. दि. ४.३.२०१५ रोजी मराठी माध्यमातील माता पालकांसाठी पाककृती स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. त्यात एकूण २४ पालकांनी सहभाग घेतला. तांदूळ व पनीर या घटकांवर आधारीत नवनवीन पाककृती पालकांनी सादर केल्या. मुख्याध्यापिका सौ. वामने व प्राथमिक विभागाच्या शिक्षिका सौ. जोशी यांनी परीक्षणाचे काम पहिले. स्पर्धा निकाल पुढील प्रमाणे -

| | |
|---|---|
| प्रथम | श्रीमती वैशाली खरात |
| द्वितीय | श्रीमती नम्रता उभारे |
| तृतीय | श्रीमती वैशाली तोंदले |

दि. ८. मार्च रोजी **अन्नतंत्र शास्त्रज्ञ सौ. उज्वला संजीव राजे** यांचे **ब्रेस्ट कॅन्सर** या विषयावर **व्याख्यान** आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमासाठी विद्याभवन घाटकोपर येथील निवृत्त शिक्षिका सौ. श्रद्धा कर्णीक तसेच मुख्याध्यापिका सौ. साधना कुलश्रेष्ठ व सौ. मुळीक तसेच सर्व शिक्षिका व माता पालक उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पाक कला स्पर्धेतील विजेत्या माता पालकांना पारितोषिके देण्यात आली. तसेच विद्यालयाला वेळोवेळी सहकार्य करणाऱ्या **सौ. रुपाली रवींद्र पाटील** या माता पालकांचा '**आदर्श पालक**' म्हणून सत्कार करण्यात आला. सौ. उज्वला राजे यांनी स्वानुभवावर आधारित काही महत्त्वाच्या बाबी पालकांच्या निदर्शनास आणून दिल्या. महिलांचे घरातील अस्तित्व हे फार महत्त्वाचे असते. प्रत्येक स्त्रीने घराबरोबरच स्वत:च्या वैयक्तिक स्वास्थ्याकडे लक्ष दिले

पाहिजे असे त्यांनी सांगितले. तसेच ब्रेस्ट कॅन्सर ची लक्षणे व त्यावरील उपाय या संदर्भात स्वत:चे अनुभव कथन केले. प्रत्येक स्त्रीने स्वत:च्या शारीरिक बदलांकडे वेळीच लक्ष देऊन वय वर्षे ३० नंतर प्रतीवर्षी डॉक्टरी तपासणी करुन घेणे गरजेचे आहे असा स्त्रीला विचार करायला लावणारी माहिती त्यांच्या व्याख्यानातून मिळाली. हा प्रश्न पालक महिलांनी उचलून धरला व मनातल्या अनेक शंकाना वाट करुन दिली. सौ. उज्वला राजे यांनी अत्यंत आपुलकीने सर्वांच्या शंकांचे समाधान केले. सर्व उपस्थितांचे आभार सौ. विद्या झोपे यांनी मानले, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. सुषमा हर्षल पाटील यांनी केले.

**प्राथमिक इंग्रजी**
**मुख्याध्यापिका : सौ. मनिषा मुळीक**

### शिवजयंती

दि. १८.२.२०१६ रोजी शाळेच्या सभागृहात शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास मुख्याध्यापिका सौ. साधना कुलश्रेष्ठ प्राथमिक व माध्यमिक इंग्रजी विभागाचे सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थी आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस मुख्याध्यापिका सौ. साधना कुलश्रेष्ठ यांच्या हस्ते पुष्पहार घालून करण्यात आली. यावेळी शिवरायांचा जीवनालेख विद्यार्थ्यांनी खूपच चांगल्या रीतीने मांडला. श्री. सुहास राऊळ (सहा. शिक्षक माध्यमिक इंग्रजी) यांनी शिवरायांविषयी माहिती दिली. सौ. साधना कुलश्रेष्ठ यांनी सर्व विद्यार्थ्यांना शिवजयंतीच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. सुहास राऊळ व आभार प्रदर्शन श्री. रमेश राऊत (सहा. शिक्षक माध्यमिक इंग्रजी) यांनी केले.

### मातृ-पितृ पूजन दिवस

दि. १२ फेब्रुवारी २०१६ श्री. योगवेदांत सेवा समिती द्वारा आयोजित मातृ-पितृ पूजन दिवस कसा साजरा करावा याची माहिती श्रीमती सुमन शर्मा यांनी प्राथमिक व माध्यमिक इंग्रजीच्या माध्यमाच्या विद्यार्थ्यांना दिली. मुख्याध्यापिका सौ. साधना कुलश्रेष्ठ व सौ. मनिषा मुळीक प्राथमिक व माध्यमिक इंग्रजी विभागाचे सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

### डेन्टल चेक अप

दि. १५ फेब्रुवारी २०१६ आणि दि. १६ फेब्रुवारी २०१६ रोजी पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक इंग्रजी विभागातील विद्यार्थ्यांच्या दातांची तपासणी डॉ. डी. जी. पोळ फाऊंडेशनच्या डॉक्टरांनी केली. यावेळी १५ डॉक्टरांचे एक पथक आले होते. त्यांनी एकूण ९९० विद्यार्थ्यांच्या दातांची तपासणी केली.

### विज्ञान दिवस

दि. २ मार्च २०१६ रोजी शाळेच्या सभागृहामध्ये विज्ञान दिवस इयत्ता १ ली ते ४ थी च्या प्राथमिक इंग्रजी विभागाने साजरा केला. या कार्यक्रमासाठी संचालक श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिक सौ. साधना कुलश्रेष्ठ व सौ. मनिषा मुळीक, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. संचालक श्री. दिनेश मिसाळ यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. त्यांनी प्रात्यक्षिके पाहून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले, व विद्यार्थ्यांना विज्ञान दिवसाचे महत्त्व सांगितले. श्रीमती फरहाना चौगुले यांनी विद्यार्थ्यांना विज्ञान दिवसाची माहिती दिली. हे प्रदर्शन शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी पाहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्रीमती फरहाना चौगुले यांनी केले.

**माध्यमिक इंग्रजी**
**मुख्याध्यापिका सौ. साधना कुलश्रेष्ठ**

### नवी मुंबई महानगरपालिका जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन २०१६

जिल्हा परिषद ठाणे शिक्षण विभाग व छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण, संचलित नूतन विद्यालय कल्याण यांच्या संयुक्त विद्यमाने ४१ वे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन दि २७ जानेवारी ते २९ जानेवारी २०१६ रोजी नूतन विद्यालय, कर्णिक रोड, कल्याण येथे आयोजित केले गेले. या प्रदर्शनात शैक्षणिक साहित्य निर्मिती मध्ये माध्यमिक इंग्रजी विभागाचे

**सहा. शिक्षक श्री. रमेश राऊत** यांना **द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. त्यांना प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.**

**चित्रकला स्पर्धा**

दि. १६ सप्टेंबर २०१५ रोजी आर्ट लाईन तर्फे इयत्ता ५वी च्या विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांनी सुयश संपादन केले. त्यांना प्रमाणपत्र व रंगपेटी देऊन गौरविण्यात आले.

| विद्यार्थ्यांचे नाव | इयत्ता | क्रमांक |
|---|---|---|
| कु. संस्कृती पाटील | ५वी / ब | प्रथम |
| कु. सिध्दी गावडे | ५वी / अ | द्वितीय |

**अभिनंदनीय वार्ता**

नवी मुंबई महानगरपालिका आयोजित **नवी मुंबई महानगरपालिका महापौर चषक, बुध्दिबळ स्पर्धा २०१६** अँकरवाला स्कूल सेक्टर १४ वाशी येथे ३० जानेवारी २०१६ रोजी घेण्यात आली. या स्पर्धेत माध्यमिक विभागातील ११९ विद्यार्थी सहभागी झाले होते. यामध्ये **कु. भावना चव्हाण (इयत्ता ८ वी)** हिने **पाचवा क्रमांक पटकावला. तिला प्रमाणपत्र व रोख रक्कम नऊशे रुपये देऊन गौरविण्यात आले.** तसेच १३ वर्षाखालील मुलांच्या गटामध्ये **कु. हरीओम त्रिपाठी (इ. ७वी) यांने १५ वा क्रमांक तर कु. ऋषी शिंदे यांने २० वा क्रमांक पटकावला.**

ओम समर्थ भारत विद्यामंदिर आयोजित खुल्या राज्यस्तरीय कराटे चॅम्पियनशिप स्पर्धा २०१६ दि. १६ जानेवारी २०१६ रोजी माहिम येथे घेण्यात आली या स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांनी सुयश संपादन केले.

| **विद्यार्थ्यांचे नाव** | **इयत्ता** | **वयोगट** | **पदक** |
|---|---|---|---|
| कु. चिराग म्हात्रे | ९ वी | १६ वर्षाखालील | कांस्य |
| कु. प्रज्वल दाभेकर | ७ वी | १४ वर्षाखालील | कांस्य |
| कु. आर्यन तळेकर | ६ वी/ब | १२ वर्षाखालील | कांस्य |

दि. ६ फेब्रुवारी २०१६ रोजी भारतरत्न राजीव गांधी जिल्हा क्रीडा संकुल, धारावी मुंबई येथे घेण्यात आलेल्या महाराष्ट्र कुडो असोसिएशन द्वारा आयोजित पाचवी राज्यस्तरीय कुडो चॅम्पियनशिप २०१५ -१६ स्पर्धेत इंग्रजी माध्यमातील खालील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

| | | | |
|---|---|---|---|
| कु. चिराग म्हात्रे | ९ वी | १६ वर्षाखालील | कांस्य |
| कु. आर्यन तळेकर | ६ वी/ब | १२ वर्षाखालील | कांस्य |

दि. ७ फेब्रुवारी २०१६ रोजी **महाराष्ट्र कुडो असोसिएशन द्वारा आयोजित मुंबई मेयर कप कुडो चॅम्पियनशिप स्पर्धा** स्पोर्ट कॉम्प्लेक्स, धारावी येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांनी सुयश संपादन केले.

| | | | |
|---|---|---|---|
| कु. चिराग म्हात्रे | ९ वी | १६ वर्षाखालील | कांस्य |
| कु. प्रज्वल दाभेकर | ७ वी | १४ वर्षाखालील | सुवर्ण |
| कु. साक्षी देसाई | ७ वी | १४ वर्षाखालील | रौप्य |
| कु. प्रचिती चाळके | ७ वी | १४ वर्षाखालील | कांस्य |
| कु. आर्यन तळेकर | ६ वी | १२ वर्षाखालील | सुवर्ण |

दि. ८ फेब्रुवारी २०१६ रोजी विद्याभवन नेरुळ शाखेत स्पेलिंग कॉम्पिटिशन २०१५ -१६ स्पेलिंगची स्पर्धा लिंक पेन तर्फे ७ वी ते ९ वीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. त्यांची पुढील स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. तसेच १० विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ बक्षिसे मिळाली.

| **विद्यार्थ्यांचे नाव** | **इयत्ता** | **क्रमांक** |
|---|---|---|
| कु. आदेश चौधर | ९ वी | प्रथम |
| कु. स्नेहा शर्मा | ९ वी | द्वितीय |

**निरोप समारंभ**

इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ दि. ३० जानेवारी २०१६ रोजी आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमास उपकार्याध्यक्ष प्राचार्य हणमंत भोसले, संचालक डॉ. शं. पां. किंजवडेकर, श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका सौ. साधना कुलश्रेष्ठ, सौ. उषा वामने, सौ. सुवर्णा मिसाळ व सौ. मनिषा मुळीक, सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे

प्रास्ताविक व सूत्रसंचालन सहा. शिक्षिका श्रीमती रत्ना सिंग यांनी केले. विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून शाळेविषयी व शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. शालेय व्यवस्थापनाचा आणि शिक्षकांचा त्यांच्या जडणघडणीत मोलाचा वाटा आहे, असे सांगून शालेय जीवनातील अनुभव व्यक्त केले. उपकार्याध्यक्ष प्राचार्य हणमंत भोसले यांनी विद्यार्थ्यांना आपले आवडीचे क्षेत्र निवडा, त्यात उज्वल यश संपादन करा असे सांगून शुभेच्छा दिल्या. संचालक डॉ. शं. पां. किंजवडेकर यांनी शंभर टक्के निकालाबरोबर विशेष योग्यता व प्रथम श्रेणीचा आलेख वाढला पाहिजे असे सांगून माजी विद्यार्थी मंडळाचे सदस्यत्व स्वीकारणाऱ्या सर्वांचे अभिनंदन केले. संचालक श्री. दिनेश मिसाळ यांनी विद्यार्थ्यांना वेळेचे महत्त्व सांगून प्रत्येक क्षणाचा अभ्यासासाठी चांगला उपयोग करुन उत्कृष्ट यश संपादन करण्यास सांगितले. मुख्याध्यापिका सौ. साधना कुलश्रेष्ठ व सौ. उषा वामने यांनी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करुन शुभेच्छा दिल्या. इंग्रजी माध्यमाच्या सहा. शिक्षिका सौ. वर्षा निकम, सौ. दीपा मुत्थुमणी, प्राथमिक मराठी विभागाच्या सहा. शिक्षिका सौ. कविता तेंडुलकर यांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी पुष्पगुच्छ व लोखंडी कपाट शाळेला भेट दिले. मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी, ग्रंथालयासाठी अनेक उपयुक्त पुस्तके देण्याचे जाहीर केले. इंग्रजी माध्यमाच्या सहा. शिक्षिका श्रीमती सायरा टोले यांनी उपस्थितांचे आभार मानले व कार्यक्रम संपन्न झाला.

### नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती

दि. २३ जानेवारी रोजी भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे क्रांतिकारी नेते नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती शाळेच्या सभागृहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास मुख्याध्यापिका सौ. साधना कुलश्रेष्ठ आणि सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते. सहा. शिक्षिका कु. शैलजा आंबवडे व श्री. रमेश राऊत यांनी नेताजींच्या जीवनातील घटनाक्रम भाषणातून मांडला. त्यांचे शिक्षण, बालपण, राजकारण, देशाचे नेतृत्त्व इत्यादींचा आढावा घेण्यात आला. विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून नेताजींच्या विषयी माहिती सांगितली. सहा. शिक्षिका उज्वला शिंदे यांनी सूत्रसंचालन केले व उपस्थितांचे आभार मानले.

### अभिनंदनीय वार्ता

दि. १७ फेब्रुवारी २०१६ रोजी राष्ट्रीय ग्रामीण विकास केंद्र व नूतन मराठी विद्यालय आयोजित कबड्डी महोत्सव २०१६ नेरुळ नवी मुंबई येथे आयोजित केला होता. यामध्ये विद्याभवन माध्यमिक इंग्रजी विभागाच्या विद्यार्थिनींनी खो- खो स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावला. त्यांना प्रमाणपत्र, चषक व रोख रुपये १०००/- देऊन गौरविण्यात आले.

**सर्व यशस्वी विद्यार्थी, त्यांचे मार्गदर्शक आणि यशस्वी शिक्षकांचे शाळेच्या व संस्थेच्या वतीने यशस्वी हार्दिक अभिनंदन!**

### माहितीपर व्याख्यान

दि. ६ फेब्रुवारी २०१६ रोजी रंगूनवाला फाउन्डेशन (इंडिया) ट्रस्ट तर्फे माहितीपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमास मुख्याध्यापिका सौ. साधना कुलश्रेष्ठ, शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. मुख्याध्यापिका सौ. साधना कुलश्रेष्ठ यांनी व्याख्याते श्री. भरत मंडल यांचे स्वागत केले. व्याख्याते श्री. भरत मंडळ यांनी विद्यार्थ्यांना रुग्णांचे अधिकार, सरकारी व खाजगी दवाखान्यातील सवलतींचा लाभ रुग्णांनी कसा घ्यावा याविषयी माहिती दिली. तसेच क्षयरोगाविषयीची माहिती सांगितली. मुख्यत्वे करुन क्षयरोगाची लक्षणे नेमकी काय आहेत या रोगावर उपचार कसा करता येता हे सांगून क्षयरोग होऊ नये यासाठी काय खबरदारी घ्यावी याविषयी मार्गदर्शन केले. सहा. शिक्षक श्री. रमेश राऊत यांनी सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले.

### मराठी भाषा दिन

दि. २७ फेब्रुवारी २०१६ मराठी भाषा दिन इंग्रजी माध्यमिक विभागाने उत्साहात साजरा केला. मराठी

दिनाबद्दल सहा. शिक्षिका श्रीमती शैलजा आंबवडे यांनी माहिती सांगितली यामध्ये त्यांनी, मराठी साहित्य, ओव्या, सुभाषिते, भारुडे याविषयीचा आढावा घेतला. मराठी भाषेचा ठेवा संवर्धन करण्याची गरज आहे असे त्यांनी आपल्या भाषणातून सांगितले. सहा. शिक्षिका मीरा कदम यांनी कवि कुसुमाग्रजांच्या कवितांचे गायन केले. मुख्याध्यापिका सौ. साधना कुलश्रेष्ठ यांनी विद्यार्थ्यांना मराठी भाषादिनाच्या शुभेच्या दिल्या. या प्रसंगी मुख्याध्यापिका सौ. मनिषा मुळिक, सौ. साधना कुलश्रेष्ठ सर्व शिक्षकवृंद विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून मराठी भाषेचे महत्त्व विशद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक सहा. शिक्षका कु. मनिषा मुळे यांनी केले. आभार सौ. वर्षा निकम यांनी मानले.

### विज्ञान दिन

दि. २८ फेब्रुवारी विज्ञान दिनाचे निमित्ताने माध्यमिक इंग्रजी विभागाने दि. ३ मार्च २०१६ रोजी विविध वैज्ञानिक उपक्रमांचे सादरीकरण केले. या कार्यक्रमाप्रसंगी संचालक श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका सौ. साधना कुलश्रेष्ठ, शिक्षकवृंद, विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी विज्ञान दिनाबद्दल भाषण केले. सहा. शिक्षिका सौ. कृष्णप्रिया रतीष यांनी श्री सी. व्ही. रमन यांच्या विषयी माहिती सांगितली. विद्यार्थ्यांनी हसत खेळत विज्ञान या माध्यमातून विविध वैज्ञानिक प्रयोगांचेही सादरीकरण केले. संचालक श्री. दिनेश मिसाळ यांनी विद्यार्थ्यांनी चिकित्सक वृत्ती हा गुण अंगी बाणवावा असे सांगून मार्गदर्शन केले. मुख्याध्यापिका सौ. साधना कुलश्रेष्ठ यांनी सर्वांना विज्ञान दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्रीमती कृष्णप्रिया रतीष यांनी केले.

***

## माजी विद्यार्थी मंडळ,मुंबई

**अध्यक्ष : डॉ. शं. पां. किंजवडेकर**

मंडळाच्या नवीन निवडून आलेल्या सभासदांची पहिली सभा विद्याभवन, घाटकोपर येथे दि. २१ फेब्रुवारी २०१६ रोजी झाली. या सभेत २०१६-१८ या तीन वर्षासाठी पुढील कार्यकारी मंडळाची निवड करण्यात आली.

| | |
|---|---|
| **अध्यक्ष** | डॉ. शं. पां. किंजवडेकर |
| **उपाध्यक्ष** | ॲड. मा. पां. फणसे |
| | श्री. म. अ. जोशी |
| **सचिव** | सौ. रुपल पालकर |
| **कोषपाल** | सौ. पौर्णिमा खरजे |
| **उपकोषपाल** | सौ. कविता तेंडुलकर |
| **उपसचिव** | डॉ. दिलीप कदम |
| | कु. आरती औचर |
| **सभासद** | श्री. शिवाजीराव पाटील |
| | श्री. श्री. ज. वैद्य |
| | श्री. शशिकांत पुजारी |
| | श्री. ल. दि. कुलकर्णी |
| | श्री. बा. गो. कुलकर्णी |
| **स्वीकृत सभासद** | श्री. तु. रं. दौंडकर |
| | श्री. अ. चं. लोणकर |
| **निमंत्रित** | प्रा. कृ. ना. शिरकांडे |
| | श्री. राजेंद्र बोऱ्हाडे |
| | श्री. दिनेश मिसाळ |
| | श्री. पां. म. गोखले |
| | श्री. ज्ञानदेव वायाळ |
| | श्री. तुकाराम मोहिते |
| | श्री. पां. बा मुळीक |
| | श्री. राजाराम बंडगर |
| | श्री. अविनाश कुलकर्णी |
| | श्री. दीपक निचित |
| | सौ. अनुराधा मेहेंदळे |

***

# कै. माधवराव बळवंत उर्फ काकासाहेब देशमुख विद्यालय, पंचवटी, नाशिक

**संचालक : श्री. अमोल म. जोशी** **मुख्याध्यापक : श्री. ज्ञानेश्वर निंबेकर**

## तिळगुळ समारंभ

विद्यालयात तिळगुळ समारंभ उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संचालक श्री. अमोल जोशी यांनी भूषविले. प्रमुख अतिथी संचालक डॉ. निहार वाळिंबे आणि डॉ. श्री. एकनाथ कुलकर्णी अध्यक्ष माजी विद्यार्थी मंडळ नाशिक उपस्थित होते. डॉ. एकनाथ कुलकर्णी यांनी संक्रांत सणाचे महत्व सांगून शुभेच्छा दिल्या. तसेच आरोग्यविषयक महत्व, आहार विहार दिनचर्या इ. विषयी मार्गदर्शन केले. शिक्षिका श्रीमती सुनंदा ठाकरे यांनी संक्रांत सणाचे भौगोलिक, पारंपारिक, आधुनिक महत्व सांगितले. प्रमुख अतिथींच्या हस्ते विद्यार्थ्यांना तिळगुळ वाटप करण्यात आले. माजी विद्यार्थी मंडळाच्या वतीने इ. १० वीच्या विद्यार्थ्यांना फोल्डर वाटप करण्यात आले. ज्येष्ठ शिक्षक श्री. शिवाजी माळी यांनी सूत्रसंचालन केले. श्रीमती अर्चना केकाण यांनी आभार प्रदर्शन केले.

## इयत्ता दहावी आशीर्वाद समारंभ

दि. २६.२.२०१६ रोजी इयत्ता १० वी चे विद्यार्थ्यांसाठी आशीर्वाद समारंभ संपन्न झाला. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर या कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. इ. १० वी तील विद्यार्थी चि. राजेश रंगनाथ राव, चि. गौरव विनायक नागरे व चि. विनोद झुंबर गोऱ्हे यांनी आपल्या मनोगतातून शालेय जीवनातील विविध आठवणी कथन केल्या. शिक्षक श्रीमती सुनंदा ठाकरे, श्री. शिवाजी माळी, सौ. तेजश्री जोशी, श्रीमती सविता चव्हाण यांनी मार्गदर्शनपर भाषणे केली. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी ''विद्यार्थ्यांनी परीक्षेस आत्मविश्वासाने सामोरे जा'' असे सांगितले. चि. ऋषिकेश इंगळे या विद्यार्थ्यांने आभार मानले, सद्‌तम शेख इ. १०वी या विद्यार्थ्यांने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## मराठी दिन

विद्यालयात राजभाषा मराठी दिन उत्साहात संपन्न झाला. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांचे हस्ते कुसुमाग्रजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. श्रीमती सुनंदा ठाकरे यांनी मराठी दिनाचे महत्त्व सांगून कुसुमाग्रजांचे सामाजिक, साहित्यिक कार्याविषयी माहिती दिली. मुख्याध्यापिकांनीही मराठी दिनाच्या शुभेच्छा देऊन आपल्या मातृभाषेविषयी आभिमान बाळगावा असे सांगितले. मराठी दिनाच्या निमित्ताने मराठी गीत गायन स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेचे परिक्षण श्रीमती अर्चना केकाण आणि श्रीमती सुनंदा ठाकरे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. तेजश्री जोशी यांनी केले. गीत गायन स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांची नावे पुढील प्रमाणे -

**इयत्ता ५ वी ६ वी गट**

| | | |
|---|---|---|
| प्रथम | कु. विशाल काळे | इ. ६वी |
| द्वितीय | कु. धनंजय गायकवाड | इ. ५वी |

**इ. ७ वी ते ९वी गट**

| | | |
|---|---|---|
| प्रथम | कु. रोहन कांबळे | इ. ७ वी |
| द्वितीय | कु. विक्रांत केकाणे | इ. ७वी |

**उत्तेजनार्थ** १) ऋषिकेश डावरे ८ वी
२) परिमल जाधव ९ वी.

## शिवजयंती

विद्यालयात शिवजयंतीचा कार्यक्रम उत्साहाने संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांचे हस्ते प्रतिमापूजन संपन्न झाले. विद्यार्थी चि. गणेश अनार्थे इ. ६ वी, चि. साई सोनवणे इ. ६ वी, चि. दिंगबर महाले यांनी भाषणे केली. चि. सुमित बावीस्कर इ. ८ वी, चि. ऋषिकेश डावरे इ. ८ वी या विद्यार्थ्यांनी शिवरायांचा जीवनपट काव्य, पोवाडे इ.

च्या सादरीकरणातून कथन केला. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनीही शिवरायांच्या जीवनातील प्रेरक प्रसंग कथन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन सौ. तेजश्री जोशी यांनी केले. शिक्षक प्रतिनिधी श्रीमती अर्चना केकाण यांनी आभार मानले .

### अपूर्व विज्ञान मेळावा

राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने विद्यालयात अपूर्व विज्ञान मेळावा आयोजित करण्यात आला. या मेळाव्या निमित्त भौतिक शास्त्राचे नोबेल पुरस्कार प्राप्त चंद्रशेखर व्यंकट रमण यांच्या प्रतिमेचे पूजन विज्ञान शिक्षक श्री. शिवाजी माळी, सौ. अस्मिता बावधनकर श्रीमती अर्चना केकाण यांचे हस्ते करण्यात आले. सौ. अस्मिता बावधनकर यांनी चंद्रशेखर व्यंकट रमण यांचे संशोधन कार्याविषयी माहिती दिली. विज्ञान दिनाच्या निमित्ताने विद्यालयात 'रमण दालन' व 'कुसुमाग्रज' दालनांची निर्मिती करुन रमण दालनात इ. ७ वी, ८वी, ९ वी, च्या एकूण १२ आणि कुसुमाग्रज दालनात इ. ५ वी ६ वी च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन तंत्रज्ञानविषयक प्रात्यक्षिके, तक्ते इत्यादी मांडणी केली. या विद्यार्थ्यांस विज्ञान शिक्षक श्री. शिवाजी माळी, सौ. अस्मिता बावधनकर, श्रीमती अर्चना केकाण या विज्ञान शिक्षकांचे मागदर्शन लाभले. ✻✻✻

## पुणे विद्यार्थी गृह, माजी विद्यार्थी महामंडळ
## चौथे माजी विद्यार्थी स्नेहसंमेलन पुणे ११ व १२ मे २०१६
### *सर्वांना सस्नेह निमंत्रण*

माजी विद्यार्थी बंधुभगिनींनो,

प्रतिवर्षीप्रमाणे या वर्षी माजी विद्यार्थी स्नेहसंमेलन पुणे विद्यार्थी गृह, मुख्यालय १७८६ सदाशिव पेठ, पुणे ३०. येथे दि. ११ व १२ मे २०१६ रोजी आयोजित केले आहे. आपण संमेलनास अवश्य उपस्थित राहावे अशी आग्रहाची विनंती आहे. कार्यक्रमाची रूपरेषा पुढीलप्रमाणे आहे.

**बुधवार दिनांक ११ मे २०१६**

- ✻ दुपारी ३.३० वाजता माजी विद्यार्थ्यांचे आगमन व स्वागत
- ✻ ३.३० ते ५.०० नोंदणी, जलपान व मुख्यालय विभागांना भेट
- ✻ ५.०० ते ७.०० शैक्षणिक परिसंवाद (विषय:- शिक्षण संस्थापुढील भविष्यातील आव्हाने)
- ✻ ७.०० ते ८.०० विद्यार्थ्यांचे विविध गुण दर्शन
- ✻ ८.०० ते ९.०० भोजन
- ✻ ९.०० ते १०.०० महामंडळ कार्यकरिणी सभा
- ✻ ९.०० विश्रांती (अन्य माजी विद्यार्थ्यांसाठी)

बाहेरुन येणाऱ्यांची निवासव्यवस्था संस्थेत केली आहे.

**गुरुवार दिनांक १२ मे २०१६**

- ✻ ८.०० ते ९.०० अल्पोपहार
- ✻ ९.०० ते ११.०० विद्यानगरी आवार भेट
- ✻ ११.०० ते १.०० चर्चा सत्र 'चांदेगाव शाखा प्रकल्प'
- ✻ १.०० ते २.०० भोजन
- ✻ २.०० ते ३.३० माजी विद्यार्थी सभा (विद्यार्थ्यांचे मनोगत)
- ✻ ३.३० ते ७.०० संस्थेच्या १०७ व्या वर्धापनसमारंभात सहभाग
- ✻ सायंकाळी ७.०० चहापान व निरोप

स्नेहसंमेलनाची वर्गणी रु ३००/- आपल्या माजी विद्यार्थी मंडळामार्फत किंवा सरळ श्री कृष्णाजी कुलकर्णी संचालक, पुणे विद्यार्थी गृह मुख्यालय, १७८६ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० यांचे कडे पाठवावी.

कार्यक्रमाबद्दल आपल्या काही सूचना असल्यास मला डॉ. शं. पां किंजवडेकर (मो.९८२०६३९७७३) किंवा श्री. कृष्णाजी कुलकर्णी (मो. ९८२२७७६७६५) यांना जरुर कळवाव्यात.

आपल्या स्वागताच्या प्रतीक्षेत,

**आपले स्नेहांकित,**

**प्राचार्य के. एन. शिरकांडे** — अध्यक्ष (मो.९८१९१२२००१)

**डॉ. शं. पां. किंजवडेकर** — महासचिव

पुणे विद्यार्थी गृह, माजी विद्यार्थी महामंडळ

# हितचिंतक व आश्रयदाते यांच्या मदतीचे वृत्त, पुणे विभाग

**कोषाध्यक्ष – श्री. राजेंद्र बोऱ्हाडे** **संचालक – श्री. कृष्णाजी कुलकर्णी**

**दि. १.२.२०१६ ते १५.२.२०१६**

**पुढील देणगीदारांनी संस्थेला देणगी देऊन सक्रिय सहाय्य केलेले आहे. संस्थेविषयी असलेल्या आत्मीयतेबद्दल सर्वांचे आभारी आहोत.**

**देणगी रु. १०,००१/- वरील सर्व**

**श्री. रामकृष्ण शंकर काणे, मुंबई**
**देणगी रु. १,०२,०००/-**

श्री. रामकृष्ण शंकर काणे यांनी दि. १४.२.२०१६ रोजी रु. १,०२,०००/- ची देणगी दिलेली आहे. सदर देणगी रु. २५,०००/- चा विनियोग वडिल कै. शंकर नारायण काणे (८ डिसेंबर) तसेच देणगी रु. २६,०००/- आई कै. उमाबाई शंकरराव काणे (१२ डिसेंबर) यांचे पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. तसेच रु. ५१,०००/- ची देणगी संस्थावाढीसाठी दिलेली आहे. सदर देणगी व्याजाचा विनियोग प्रतिवर्षी संबंधितांच्या स्मृतिदिनी आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात येईल.

**श्रीमती सुमन सिध्दये, पुणे**
**देणगी रु. १६,०००/-**

श्रीमती सुमन सिध्दये यांनी दि. १२.२.२०१६ रोजी रु. १६,०००/- ची सदिच्छा देणगी दिलेली आहे.

**श्री. अमरेंद्र प्रभाकर गोरे, पुणे**
**देणगी रु. १५,६००/-**

श्री. अमरेंद्र प्रभाकर गोरे यांनी दि. १.२.२०१६ रोजी रु. १५,६००/- ची देणगी दिलेली आहे. सदर देणगी कै. धोंडुबाई कुलकर्णी (१ जून) रु. ३,०००/- कै. गोविंदराव पटवर्धन (३० जानेवारी) रु. १,५००/-, कै. ज्येष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर (२ सप्टेंबर) रु. ३,०००/- संत चांगदेव महाराज (माघ वद्य ३०) रु. २,०००/-, डॉ. कै. ना. भि. परुळेकर (मा.वि.) रु. ३,०००/-, गझल सम्राट कै. सुरेश भट (१४ मार्च) रु. ३०००/-, कै. गोविंदराव पटवर्धन (३० जानेवारी)



धोंडुबाई कुलकर्णी



वि. स. खांडेकर



संत चांगदेव



डॉ.ना.भि.परुळेकर

रु. १००/- यांच्या पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगी व्याजाचा विनियोग प्रतिवर्षी संबंधीताच्या स्मृतिदिनी आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात येईल.

**श्री. गणेश श्रीपाद उर्फ बाबुजी निसळ व सौ. वत्सलाबाई निसळ, पुणे देणगी रु. १३,०००/-**

श्री. गणेश श्रीपाद उर्फ बाबुजी निसळ व सौ. वत्सलाबाई निसळ यांनी दि. ३.२.२०१६ रोजी रु. १३,०००/- ची देणगी दिलेली आहे. सदर देणगी रु. १२,०००/- च्या व्याजाचा विनियोग इंटरमिजिएट व एलिमेंट्री चित्रकला विषयात विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यास देण्यासाठी करण्यात येईल तसेच रु. १,०००/- चा विनियोग चालू वर्षासाठी करण्यात येईल.

**सौ. संध्या चंद्रशेखर वेलणकर, पुणे**

**सौ. संध्या चंद्रशेखर वेलणकर, पुणे**

**देणगी रु. १२,०००/-**

सौ. संध्या चंद्रशेखर वेलणकर यांनी दि. १.२.२०१६ रोजी १२,०००/- ची देणगी स्वत:च्या वाढदिवसानिमित्त दिलेली आहे. सदर देणगी व्याजाचा विनियोग प्रतिवर्षी २९ जानेवारी रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांना फळे/ बिस्कीटे देण्यासाठी करण्यात येईल.

**डॉ. प्रियदर्शन मुरलीधर जोगळेकर, पुणे**

**देणगी रु. ११,०००/-**



मुरलीधर जोगळेकर

डॉ. प्रियदर्शन मुरलीधर जोगळेकर यांनी दि. ५.२.२०१६ रोजी वडिल कै. मुरलीधर दत्तात्रय जोगळेकर (१३ नोव्हेंबर) यांचे पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात आला.

**श्री. सतीश वसंत ठोंबरे, पुणे**

**देणगी रु. १०,००१/-**

श्री. सतीश वसंत ठोंबरे यांनी दि. १०.२.२०१६ रोजी रु. १०,०००/- ची देणगी दिलेली आहे. सदर देणगी व्याजाचा विनियोग प्रतिवर्षी आश्रमीय इ. १० वी मधील गरीब , गरजु, हुशार, होतकरु अशा विद्यार्थ्यांस शैक्षणिक मदतीसाठी करण्यात येईल.

**देणगी रु. ५,००१/- ते रु. १०,०००/-**

**सौ. अरुंधती दत्तात्रय टोळ, पुणे**

**देणगी रु. ६,०००/-**

सौ. अरुंधती दत्तात्रय टोळ यांनी दि. ५.२.२०१६ रोजी रु. ६,०००/- ची देणगी आई कै. लक्ष्मीबाई (संजीवनी) माधव रास्ते यांचे स्मृतिप्रित्यर्थ दिलेली आहे. सदर देणगी रु. ५,०००/- च्या व्याजाचा विनियोग प्रतिवर्षी ८ फेब्रुवारी आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात येईल. तसेच रु. १०००/- विनियोग चालू वर्षासाठी करण्यात आला.

**सौ. प्रतिमा जयंत कुलकर्णी, पुणे**

**देणगी रु. ७,५००/-**

सौ. प्रतिमा जयंत कुलकर्णी यांनी दि. ५.२.२०१६ रोजी रु. ७,५००/- ची देणगी कै. मोरेश्वर सखाराम देशपांडे यांचे पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग दि. १३.३.२०१६ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांना मिष्टान्नासह संपूर्ण भोजन देण्यासाठी करण्यात आला.

**श्री. सौमील सुर्यकांत शहा, पुणे**

**देणगी रु. ५,५००/-**

श्री. सौमील सुर्यकांत शहा यांनी दि. ५.२.२०१६ रोजी रु. ५,५००/- ची देणगी स्वत:च्या लग्नाच्या वाढदिवसानिमित्त (१३.२.२०१६) दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग आश्रमीय विद्यार्थ्यांना पावभाजी तसेच मिष्टान्न जिलेबी देण्यासाठी करण्यात आला.

**श्री. अनिल भिमराव महाडिक, पुणे**

**देणगी रु. ५,००१/-**

श्री. अनिल भिमराव महाडिक यांनी दि. ६.२.२०१६ रोजी रु. ५,००१/- ची देणगी वडिल कै. भिमराव अनंत महाडिक यांचे प्रथम वर्षश्राद्धानिमित्त दिलेली आहे. सदर देणगी व्याजाचा विनियोग प्रतिवर्षी १२ फेब्रुवारी रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात येईल.

**श्रीमती उषा यशवंत कानिटकर, पुणे**

**देणगी रु. ५,५००/-**



यशवंत कानिटकर

श्रीमती उषा यशवंत कानिटकर यांनी दि. ८.२.२०१६ रोजी रु. ५,५००/- ची देणगी कै. यशवंत नारायण कानिटकर (१२.२) यांच्या स्मृतिप्रित्यर्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग आश्रमीय विद्यार्थ्यांना जिलेबीसह संपूर्ण भोजन देण्यासाठी करण्यात आला.

**ॲड. सिद्धार्थ विठ्ठल लिखिते, पुणे**

**देणगी रु. ५,५००/-**


विठ्ठल लिखिते

ॲड. सिद्धार्थ विठ्ठल लिखिते यांनी दि. ८.२.२०१६ रोजी रु. ५,५००/- ची देणगी कै. विठ्ठल भगवंतराव लिखिते यांचे पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग दि. ९.२.२०१६ रोजी सकाळी आश्रमीय विद्यार्थ्यांना मिष्टान्न जिलेबीसह संपूर्ण भोजन देण्यासाठी करण्यात आला.

**श्री. कन्हैयालाल रणधोडदास सुंगधी, पुणे**

**देणगी रु. ५,५००/-**


रणछोडदास सुगंधी

श्री. कन्हैयालाल रणछोडदास सुंगधी यांनी दि. ९.२.२०१६ रोजी रु. ५,५००/- ची देणगी कै. रणछोडदास मनमोहनदास सुंगधी यांच्या तेराव्यानिमित्त दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग दि. १५.२.२०१६ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांना मिष्टान्नासह संपूर्ण भोजन देण्यासाठी करण्यात आला.

**श्रीमती मीना सत्यनारायण, बेळगांव**

**देणगी रु. ७,५००/-**


पार्वतीबाई वैद्य

श्रीमती मीना सत्यानारायण यांनी दि. १०.२.२०१६ रोजी रु. ७,५००/- ची देणगी वडिल कै. निळकंठ दामोदर वैद्य (११ फेब्रुवारी ) व मातोश्री कै. श्रीमती पार्वतीबाई निळकंठ वैद्य (१३ फेब्रुवारी) यांच्या पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग आश्रमीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक मदतीसाठी करण्यात येईल.

**कु. धनश्री भालचंद्र खांबेटे, पुणे**

**देणगी रु. ६,०००/-**

कु. धनश्री भालचंद्र खांबेटे यांनी दि. ११.२.२०१६ रोजी रु. ६,०००/- ची देणगी वडिल कै. भालचंद्र दिगंबर खांबेटे (माघ शुद्ध प्रतिपदा) यांच्या पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगी पूर्वीच्या देणगीत समाविष्ट करून येणाऱ्या व्याजाचा विनियोग स्मृतिदिनी आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात येईल.

**श्री. विवेक श्रीकांत कुलकर्णी (मा.वि.), पुणे**

**देणगी रु. ५,५००/-**

श्री. विवेक श्रीकांत कुलकर्णी यांनी दि. १३.२.२०१६ रोजी रु. ५५००/- ची देणगी सासरे कै. मुकुंद विष्णू एकबोटे यांच्या पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग २५ फेब्रुवारी २०१६ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांना ढोकळा मिष्टान्नासह संपूर्ण भोजनासाठी करण्यात आला.

**श्री. अमित रमेश अवचट, पुणे**

**देणगी रु. ५,०००/-**

श्री. अमित रमेश अवचट यांनी दि. ४.२.२०१६ रोजी रु. ५,०००/- ची देणगी कु. अवर्णी अमित अवचट (४ फेब्रुवारी) हिच्या वाढदिवसानिमित्त दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग दि. ४ फेब्रुवारी २०१६ रोजी संध्याकाळी आश्रमीय विद्यार्थ्यांना फळासह संपूर्ण भोजन देण्यासाठी करण्यात आला.

**श्री. अमरेंद्र प्रभाकर गोरे, पुणे**

**देणगी रु. ४,५००/-**


बाबा गजबर


बाळाजी तालीम

श्री. अमरेंद्र प्रभाकर गोरे यांनी दि. १०.२.२०१६ रोजी रु. ४,५००/- ची देणगी रु. ३,०००/- कै. कलातपस्वी बाबा गजबर (२१ नोव्हेंबर), तसेच रु. १,५००/- कै. शिल्पकार बाळाजी वसंत तालीम (२५ डिसेंबर) यांचे पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगी व्याजाचा विनियोग संबंधितांच्या स्मृतिदिनी आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात येईल.

**श्री. सुरेश भूमकर, पुणे**
**देणगी रु. ५,०००/-**

श्री. सुरेश भूमकर यांनी दि. १२.२.२०१६ रोजी रु. ५,०००/- ची देणगी वडिल कै. नरहरराव भूमकर (स्वातंत्र्य सैनिक हैद्राबाद मुक्ती संग्राम लातूर) (८ फेब्रुवारी) यांचे स्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात आला.

**श्री. रामचंद्र त्रिंबक भालेराव, पुणे**
**देणगी रु. ५,०००/-**

श्री. रामचंद्र त्रिंबक भालेराव यांनी दि. १२.२.२०१५ रोजी रु. ५,०००/- ची देणगी दिलेली आहे. सदर देणगी पूर्वीच्या देणगीत समाविष्ट करुन येणाऱ्या व्याजाचा विनियोग नाशिक शाखेतील आश्रमीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक मदत देण्यासाठी करण्यात येईल.

**देणगी रु. २,००१/- ते रु. ३,०००/-**

**श्री. संतोष भालचंद्र काकडे व श्री. सुभाष भालचंद्र काकडे, पुणे देणगी रु. २,००२/-**

श्री. संतोष भालचंद्र काकडे व श्री. सुभाष भालचंद्र काकडे यांनी दि. २.२.२०१६ रोजी रु. २,००२/- देणगी वडिल कै. भालचंद्र श्रीधर काकडे यांच्या पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग दि. २ फेब्रुवारी २०१६ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात आला.

**सौ. स्वाती श्रीराम हेजीब, पुणे**
**देणगी रु. ३,०००/-**

सौ. स्वाती श्रीराम हेजीब यांनी दि. ८.२.२०१६ रोजी रु. ३,०००/- देणगी कै. कमल नारायण जोशी (४.२.२०१६) यांच्या पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग आश्रमीय विद्यार्थ्यांसाठी शिधा खरेदी करण्यासाठी करण्यात येईल.

**श्री. सदाशिव सखाराम पेंडसे, कल्याण**
**देणगी रु. ३,०००/-**

श्री. सदाशिव सखाराम पेंडसे यांनी दि. ९.२.२०१६ रोजी रु. ३,०००/- ची सदिच्छा देणगी दिलेली आहे.

**श्री. प्रकाश रंगनाथ सहस्रबुद्धे, पुणे**
**देणगी रु. २,५००/-**

श्री. प्रकाश रंगनाथ सहास्रबुद्धे यांनी दि. ९.२.२०१६ रोजी रु. २,५००/- ची देणगी आई कै. कमलाबाई रंगनाथ सहस्रबुद्धे (२८ जानेवारी) यांचे पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग सुयोग्य दिवशी आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात आला.

**सौ. मृदुल सुबोध गोडबोले, पुणे**
**देणगी रु. २,००१/-**

सौ. मृदुल सुबोध गोडबोले यांनी दि. १४.२.२०१६ रोजी रु. २,००१/- ची देणगी मकरसंक्रांतीनिमित्त दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग दि. १४.२.२०१६ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांना मिष्टान्न साजुक तुपातील शिरा देण्यासाठी करण्यात आला.

**देणगी रु. १,००१/- ते रु. २,०००/-**

**मुद्रा ११ ई सोलुशन्स प्रा. लि., ठाणे**
**देणगी रु. १,००१/-**

मुद्रा ११ ई सोलुशन्स् प्रा. लि. यांनी दि. २.२.२०१६ रोजी रु. १,००१/- देणगी दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग आश्रमीय गरीब, गरजु, हुशार विद्यार्थ्यांस शैक्षणिक मदतीसाठी करण्यात येईल.

**श्रीमती गिरिजा ओक, पुणे**
**देणगी रु. १००१/-**

श्रीमती गिरिजा ओक यांनी दि. २.२.२०१६ रोजी

रु. १,००१/- ची देणगी दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग आश्रमीय विद्यार्थ्यांना गोड पदार्थ देण्यासाठी करण्यात आला.

**श्री. चंद्रकांत गोविंद भालेराव, (मा.वि.) पुणे**

**देणगी रु. १,०००/-**

श्री. चंद्रकांत गोविंद भालेराव यांनी दि. ४.२.२०१६ रोजी रु. १,००१/- ची देणगी कै. सौ. राधाबाई भालेराव यांचा पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग दि. २६ फेब्रुवारी रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात आला.

**श्री. माधव पांडुरंग नगरकर, पुणे**

**देणगी रु. ११०१/-**

श्री. माधव पांडुरंग नगरकर यांनी दि. ६..२.२०१६ रोजी रु. १,१०१ /- ची देणगी कै. पांडुरंग नगरकर यांचे स्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग दि. ७.२.२०१६ रोजी संध्याकाळी आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात आला.

**श्री. अमरेंद्र प्रभाकर गोरे, पुणे**

**देणगी रु. १५००/-**



हरिभाऊ मदन

श्री. अमरेंद्र प्रभाकर गोरे यांनी दि. ८.२.२०१६ रोजी रु. १,५००/- ची देणगी कै. हरिभाऊ अनंत मदन यांचे पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीचा व्याजाचा विनियोग दि. २६ मार्च रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्न खर्चासाठी करण्यात येईल.

**श्रीमती जयश्री जयदत्त रास्ते, पुणे**

**देणगी रु. १,००१/-**

श्रीमती जयश्री जयदत्त रास्ते यांनी दि. ८.२.२०१६ रोजी रु. १,००१/- ची देणगी पती कै. जयदत्त रामदास रास्ते यांचे दुसऱ्या श्राद्धानिमित्त दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग दि. ८ फेब्रुवारी २०१६ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात आला.

**श्री. सुधाकर नारायण सप्तर्षी, पुणे**

